नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या	डॉ. भाऊजी दफ्तरी
धर्माजी भोसल्याचा पोवाडा	दे. गो. लांडगे
संस्कृत व्याकरणांतील परिभाषा—(सिद्धांत) त्यांचें कार्य व व्याप्ती	म. दा. साठे
साहित्याची विश्वात्मकता	नी. र. वऱ्हाडपांडे
'नवसांमाझारि शृंगारसा'	बळीराम येरकुंठवार
मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें	शंकर गोविंद चट्टे
संघवार्ता	

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

र्ष १० संपादक सप्टेंबर १९५५
ंक ६ दि. ब. पंडित किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
प्रा. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

कै. भाऊजी दफ्तरी स्मृति संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वर्ष १० वें : अंक ६ वा

सप्टेंबर १९५५.

संपादकीय

आमच्या संपादक मंडळापैकी एकानें ह्या पहिल्या पानाची रचनाच बदलून टाकली आहे. हेतु कांहीसा दुष्टपणाचाच म्हणावा लागेल. कारण ह्या रचनेमुळे पहिल्या पानावर कोणताहि लेख घेणें अशक्य होऊन संपादकीय लिहिलेंच जावें हा त्यांचा डाव.

आणि झालें हें कांही वाईट नाही. ह्या महिन्यांत तरी थोडी संपादकीय लेखनाची आवश्यकता होतीच. कारण ह्याच महिन्यांत स्वातंत्र्य-दिनाच्या दिवशीं मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेनें गेल्या वर्षातील हिंदी आणि मराठी ग्रंथांना जाहीर केलेलीं बक्षिसें ग्रंथकर्त्यांना देण्यांत आली. श्रीमती वनमाला भवाळकर, श्रीमती कुसुमावती देशपांडे, सर्वश्री अ. ना. देशपांडे, रा. शं. वाळिंबे, ना. रा. शेंडे, वामन चोरघडे, पु. व्यं. दारव्हेकर आणि डॉ. वि. भि. कोलते, ह्यांचें ह्या सन्मानाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

ह्याच साहित्य परिषदेच्या विद्यमानें गेल्यावर्षीं चार व्याख्यानसत्रें झालीं. त्यांतील श्री बाबासाहेब खापर्डे आणि श्री श्री. म. माटे ह्यांचीं व्याख्यानें मराठींतून झालीं. मराठी आणि हिंदी दोन्ही व्याख्यानांचीं परस्पर भाषांतरें झाल्यास फारच उत्तम होईल. कारण ह्या दोन्हीच काय पण साऱ्याच भारतीय भाषांची साहित्यिक मूलभूत प्रकृति पूर्णत: समान आहे. आणि विविध भाषांचा संपर्क जितका दृढ होईल तेवढीच त्यांची प्रीति वाढेल देखील.

पूज्य विनोबाजींचा सप्टेंबर ११ रोजीं जन्मदिन आहे. आमच्या वाटणीचें भाग्य म्हणून त्यांची षष्ट्यब्दपूर्ति ह्या वर्षी होतें आहे. विनोबा महात्माजींचे अंतेवासी, त्यांच्या सत्याहिंसामय तत्त्वज्ञानाचे मीमांसक, कांचनमुक्तीचे प्रयोगवीर आणि भूदान-यज्ञाचे अध्वर्यु म्हणून जगद्विख्यात आहेतच, पण त्यांनी मराठी वाङ्मयांत अमूल्य भर घातली आहे. त्यांची शैली आहे, त्या शैलीची जनयित्री दृष्टि आहे. मराठी वाङ्मय त्यांचें ऋणी आहे मराठीभाषी त्यांचे अनृणी होऊं शकणार नाहीत. पण पूजा शक्य आहे. म्हणून पुढच्या महिन्याचा अंक विनोबाजी अंक प्रसिद्ध करावा अशी आमची इच्छा आहे. ज्यांनी विनोबाजींच्या वाङ्मयाचा अभ्यास केला असेल त्यांनी आम्हाला लेखनसाहाय्य करावें अशी विनंती आहे. येथे भक्ति आहे पण अभिनिवेश नाही. म्हणून त्यांच्या मतांचा प्रतिवाद करणारे लेखहि स्वागतार्ह आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कठोपनिषद्

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दफ्तरी

वल्ली २ श्लोक १४

अन्यत्र धर्मादन्यत्राधर्मात् ।
अन्यत्रास्मात्कृताकृतात् ॥
अन्यत्र भूताच्च भव्याच्च ।
यत्तत्पश्यसि तद्वद ॥१४॥

अर्थ—नचिकेत म्हणाला, "अधर्माचें किंवा धर्माचेंहि आचरण न करणारे, केलेल्या म्हणजे कार्यरूप आणि न केलेल्या म्हणजे कारणरूप अशा वर्तमान जगाहून [अस्मात्] भिन्न आणि मागच्या काळच्या व पुढच्या काळच्या जगाहून भिन्न असें जें तुला दिसतें तें तूं मला सांग." परिणामवादाच्या दृष्टीने परिणामवादापूर्वीची जी अवस्था ती सांग असा भाव आहे.

टिप्पणें—हा नचिकेताचा चवथा प्रश्न नव्हे, तिसऱ्या प्रश्नाचा पोटप्रश्न आहे. म्हणजे तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर चांगल्या रीतीने समजण्यास ह्या पोटप्रश्नाचें उत्तरहि समजलें पाहिजे.

"कृताकृत"—ह्याचा अर्थ श्री. शंकराचार्यांनी केला तसा आम्ही केला आहे. पण कारण व कार्य म्हणजे ब्रह्म आणि जग ह्याहून ब्रह्म भिन्न कसें असा प्रश्न येतो. त्याचें समाधानकारक उत्तर नाही. कारण म्हणजे सूक्ष्म जग आणि कार्य म्हणजे स्थूल असें कोणी म्हणतील तर तें बरोबर नाही; कारण सूक्ष्म आणि स्थूल हीं दोनहि ब्रह्माचीं कार्येंच होत. म्हणून कृत म्हणजे मनुष्याने केलेलें आणि अकृत म्हणजे मनुष्याने न केलेलें असे अर्थ आम्ही सुचवितों त्यांचा विचार करावा. "कृत्रिम" किंवा "कृतक" ह्यांचा जो अर्थ तोच "कृत" ह्याचा होऊं शकतो.

वल्ली २ श्लोक १५

सर्वे वेदा यत्पदमामनन्ति ।
तपांसि सर्वाणि च यद्वदंति ॥
यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति ।
तत्ते पदं संग्रहेण ब्रवीमि ॥ ओमित्येत् ॥१५॥

अर्थ—"सर्व वेद ज्या पदाचें वर्णन करतात, ज्या पदाकरितां [यत्] तपश्चर्या सांगतात, जें पद मिळण्याच्या इच्छेने ब्रह्मचर्याचें आचरण करतात, तें ओम् नांवाचें पद मी तुला थोडक्यांत [संग्रहेण] सांगतों." असें यम म्हणाला.

टिप्पणें—भगवद्गीता ८।११ येथे हा श्लोक सुधरवून घेतला आहे. त्यावरून हें उपनिषद् भगवद्गीतेच्या पूर्वीचें ठरतें.

वल्ली २ श्लोक १६–१७—

एतद्ध्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परम् ।
एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ॥१६
एतदालंबनं श्रेष्ठं एतदालंबनं परम् ।
एतदालंबनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ॥१७॥

अर्थ—ओम् हा शब्दच [अक्षरम्] ब्रह्मवाचक आहे. हें कधीहि क्षय न पावणारें [अक्षरम्] ब्रह्मच सर्वांमध्ये श्रेष्ठ आहे. हें अक्षर ब्रह्म जाणल्याने ज्याला जें पाहिजे तें मिळतें. (कारण त्या ब्रह्मापासून आनंद प्राप्त झाल्यामुळे त्याला इतर कशाची इच्छाच रहात नाही, किंवा छांदोग्य ८।२ च्या विवरणांत दाखविल्या-प्रमाणे त्याच्या इच्छा इतर जीव पुरवितात) ॥१६॥. हें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ब्रह्मच आनंदप्राप्तीचा श्रेष्ठ उपाय [आलंबनम्] आहे. तें ब्रह्म आनंदप्राप्तीचा पर म्हणजे दूर असलेला म्हणजे आटोक्याच्या पुष्कळ बाहेर असलेला अथवा सहज प्राप्त न होणारा उपाय आहे. तो उपाय जो कोणी श्रेष्टप्रतीचा मनुष्य जाणतो तो ब्रह्मलोकांत मोठा होऊन राहतो किंवा पूजिल्या जातो (ब्रह्मलोक म्हणजे काय ह्याचें स्पष्टीकरण बृहदारण्यक ४।४।२३, ४।३।३२ किंवा ४।३।३३ येथे पहा. त्यावरून दिसतें की ब्रह्मलोक म्हणजे सर्वत्र अद्वैत-दृष्टीनें पाहणाऱ्या कामरहित मनुष्याची आनंदपूर्ण अवस्था. "केन" खंड १ श्लोक २ येथील "अस्माल्लोकात्" ह्यावरील टिप्पण पहा. किंवा महीयते म्हणजे पूर्ण आनंदाचा अनुभव घेतो असाहि अर्थ असेल.)

वल्ली २ श्लोक १८–१९—

न जायते म्रियते वा विपश्चित्।
नायं कुतश्चित् न बभूव कश्चित्॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो।
न हन्यते हन्यमाने शरीरे॥१८॥
हंता चेन्मन्यते हंतुं हतश्चेन्मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते॥१९॥

अर्थ—जाणणारा [विपश्चित्] म्हणजे चैतन्य-वान् असा हा आत्मा जन्मत नाही किंवा मरतहि नाही. हा कोणापासून झाला असें नाही. हा आत्मा कोणी झाला [अयं कश्चित् बभूव] म्हणजे प्रथम एकप्रकारचा असून नंतर दुसऱ्या प्रकारचा झाला म्हणजेच विकार पावला असें नाही. हा न जन्मणारा [अज] नेहमी राहणारा, क्षीण न होणारा [शाश्वत] आणि जुनाच [पुराणः] आहे. शरीर मारलें तरी हा मारला जात नाही. ॥१८॥ मारणाऱ्याला मी ह्याला मारीन [हंतुं] असें वाटत असेल आणि मारलेल्यास मी मारला गेलों असें वाटत असेल तर ते दोघेहि खरें काय आहे तें जाणत नाहीत. [न विजानीतः] कारण हा मारूं शकत नाही आणि मारल्याहि जात नाही. ॥१९॥

टिप्पणें—भगवद्गीता २।१९–२० येथे हेच श्लोक सुधरवून घेतले आहेत.

वल्ली २ श्लोक २०–२१

अणोरणीयान् महतो महीयान्।
आत्मास्य जंतो निहितो गुहायाम्॥
तमक्रतुं पश्यति वीतशोकः।
धातुप्रसादान् महिमानमात्मनः॥२०॥
आसीनो दूरं व्रजति शयानो याति सर्वतः।
कस्तं मदामदं देवं मदन्यो ज्ञातुमर्हति॥२१॥

अर्थ—हा अणूपेक्षाहि लहान आहे (कारण तो शरीराच्या अत्यंत सूक्ष्म भागांत आहे) तो मोठ्यापेक्षाहि मोठा आहे (कारण तो जगांत सर्वत्र आहे). तो ह्या जंतूचा म्हणजे जीवाचा आत्मा म्हणजे परमात्मा आहे आणि तो पुढे वल्ली ३ श्लोक १०–११ येथे वर्णिलेल्या गुहेंत ठेविला आहे. त्या बुद्धिरहित असलेल्या [अक्रतुम्] म्हणजे बुद्धि-शिवायहि बुद्धिवंताप्रमाणे जगाची उत्पत्ति व नियमन करणाऱ्या आत्म्यास म्हणजे स्वतःच्याच मोठेपणास म्हणजे मोठ्या रूपास जीव, मन व बुद्धि ह्या धातु प्रसन्न म्हणजे स्वच्छ किंवा निर्मल झाल्या असतां, पाहतो आणि शोकरहित होतो. ॥२०॥ झोपेंत असतांना [शयानः] हा आत्मा स्वप्नानुभवाच्या वेळीं सर्वत्र फिरतो (बृहदारण्यक ४।३।१२ येथे हेंच सांगितलें आहे) आणि एकाच ठिकाणीं बसूनहि म्हणजे जागृतींतहि (जागृतींतच मनुष्य बसूं शकतो म्हणून "आसीनः" ह्याचा अर्थ जागृतींत असा होतो. शिवाय "शयानः" ह्याशीं "आसीनः" हा शब्द प्रतियोगी असल्या-मुळे त्याचा जागेपणीं असा अर्थ करावा लागतो.) मनानें दूर जातो म्हणजे मनाने दूरचे देखावे पाहतो किंवा कल्पितो, जो मदामुळे म्हणजे स्वतःच्या आनंदातिशयामुळे अमद आहे म्हणजे विषयानंदांत शिरण्याची चुकी करीत नाही, त्या आत्म्याला माझ्याइतका बुद्धिमान् नसलेल्या [मदन्यः] कोणता मनुष्य जाणूं शकेल? जाणूं शकत नाही असा भाव आहे ॥२१॥

टिप्पणें—"अक्रतुम्"—"अक्रतुः" असाहि पाठ पुष्कळ ठिकाणीं आहे पण एका ठिकाणीं "अक्रतुं" असा आहे. (अड्यारप्रत पान ८३ पहा) "क्रतु" हा शब्द प्रज्ञावाचक शब्दांमध्ये निघंटुमध्ये दिला आहे. क्रतु म्हणजे प्रज्ञा म्हणजेच बुद्धि असा अर्थ घेऊन आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"अक्रतुं" असा पाठ घेऊन अर्थ चांगला जुळतो. कारण परमात्मा बुद्धिरहित आहे हें खरेंच आहे आणि बुद्धि-रहित असणें हा कमीपणा नसून उलट फार मोठेपणाच आहे—बुद्धिशिवायहि जगाची उत्पत्ति व नियमन करणें हा मोठेपणाच आहे. श्री. शंकराचार्यांनी "अक्रतुः" असा पाठ घेऊन अक्रतुः म्हणजे "अकाम" असा अर्थ केला आहे आणि "अकाम जीव त्या परमात्म्यास पाहतो" असा श्लोकाचा अर्थ काढला आहे. पण ह्या अर्थामध्यें वस्तुस्थितीचा विपर्यास आहे, कारण खरोखर त्या परमात्म्यास पाहिल्यानंतर जीव अकाम होतो, केवळ अकाम झाल्याने परमात्म्यास पाहतो असें नाही आणि खरोखर परमात्म्यास उच्च प्रकारच्या बुद्धीनेच पाहतो असें ह्याच श्लोकाच्या द्वितीयार्धांत आणि कठवल्ली ३।१२ येथेहि सांगितलें आहे. मुंडक ३।१।१–३ ह्यांत जें सांगितलें आहे त्यास अनुसरूनच ह्या श्लोकाचा अर्थ आम्ही केला आहे.

"मदन्यः":—येथील "अन्य" शब्दाचा अर्थ असदृश असा आहे. व श्री. शंकराचार्यांनीहि असा अर्थ घेतला आहे. "अर्थोष्मणा विरहितः पुरुषः स एव अन्यः क्षणेन भवतीति विचित्रमेतत्" ह्या प्रसिद्ध सुभाषितांत "अन्य" ह्याचा हाच अर्थ आहे. "मदन्य" ह्याचा दुसराहि अर्थ करतां येतो. "मत्" हें "अहं"चेंच समासांतील रूप आहे. म्हणून 'अहं'हून म्हणजे अहंकाराहून भिन्न असा 'मदन्य' ह्याचा अर्थ होईल. "अहंकार" हा जीवाच्या जागृतावस्थेंतच असतो. म्हणून जागृतावस्थेशिवाय इतर अवस्थेंत ब्रह्म जाणतां येत नाही असा श्लोकार्थ होईल. हाच अर्थ कठवल्ली ६।१२–१३ येथेहि सांगितला आहे. बृहदारण्यक १।४।१ मध्ये "अहम्" हें आत्म्याचें अर्थात् जीवात्म्याचें नांव आहे असें म्हटलें आहे, त्याची आमच्या ह्या अर्थास पुष्टिच आहे.

"वीतशोकः"—"अक्रतुं आत्मनः महिमानम् पश्यति वीतशोकश्च भवति" असा अन्वय आम्ही पुढील २२ व्या श्लोकांतच सांगितलेल्या वस्तुस्थितीस अनुसरून केला आहे, तो कित्येकांस आक्षेपार्ह वाटेल. त्यांनी वाटल्यास "अक्रतुं आत्मनः महिमानं वीतशोकः पश्यति" असाच करावा पण त्या वस्तुस्थितीस अनुसरून "वीतशोकः" ह्याचा अर्थ "वीतशोकः भविष्यन्" म्हणजे "जो वीतशोक व्हावयाचा असेल तो" असा अर्थ करावा.

वल्ली २ श्लोक २२

अशरीरं शरीरेष्वनवस्थेष्ववस्थितम् ।
महांतं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥२२॥

अर्थ—शरीरांमधील शरीर नसलेला आणि बदलणाऱ्यामधील [अनवस्थितेषु] न बदलणारा मोठा [महांतम्] शक्तिमान् [विभु] जो आहे तोच मीं होय असें मानणारा शहाणा मनुष्य [धीर] शोकापासून मुक्त होतो. ॥२२॥

वल्ली २ श्लोक २३–२५

नायमात्मा प्रवचेन लभ्यो ।
न मेधया न बहुना श्रुतेन ॥
यमेवैष वृणुते तेन लभ्यः ।
तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ॥२३॥
नाविरतो दुश्चरितात् नाशांतो नासमाहितः ।
नाशांतमानसो वापि प्रज्ञानेनैनमाप्नुयात् ॥२४॥
यस्य ब्रह्म च क्षत्रं च उभे भवत ओदनः ।
मृत्युर्यस्योपसेचनं क इत्था वेद यत्र सः ॥२५॥

अर्थ—पुष्कळ ग्रंथ वाचल्याने [प्रवचन] किंवा यज्ञाने [मेधया] किंवा दुसऱ्यांकडून पुष्कळ ऐकल्याने [श्रुतेन] हा आत्मा मिळतो असें नाही. ज्याला हा आत्मा पसंत करतो [वृणुते] त्यालाच तो मिळतो आणि त्यालाच तो आत्मा आपलें स्वरूप [स्वां तनुं] प्रगट करतो म्हणजे उघडें करून दाखवितो [विवृणुते]. ॥२३॥ आत्मज्ञानाने [प्रज्ञानेन] देखील [अपि] हा आत्मा मिळतो असें नाही. केवळ आत्मज्ञानाने आत्यंतिक आनंद प्राप्त होत नाही असा भाव आहे. त्याकरितां दुष्कृत्यें सोडली पाहिजेत [नाविरतो दुश्चरितात्], विषयानंदाची इच्छा सोडली पाहिजे [नाशांतः], आत्मानंदाच्या ठिकाणीं मन एकाग्र केलें पाहिजे [नासमाहितः] आणि सर्व मानसिक वासना सोडल्या पाहिजेत [नाशांतमानसो] तेव्हाच आत्मा प्राप्त होतो म्हणजे आत्यंतिक अशा आत्मानंदाची प्राप्ती होते. ॥२४॥ बुद्धि किंवा बुद्धीच्या साधनाने प्राप्त होणारें अनेक प्रकारचें ज्ञान [ब्रह्म] आणि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शक्ति किंवा शक्तीच्या साधनानें केलीं जाणारीं अनेक कर्में [क्षत्रं] हें ज्याचें अन्न [ओदन] आहे आणि झोप [मृत्यु] हें ज्याचें पेय [उपसेचन] आहे म्हणजे ज्ञानकर्म व झोप हीं ज्याचीं आनंदानुभवाचीं साधनें होत, तो आत्मा येथें [इत्था] म्हणजे ह्या शरीरांत जेथें [यत्र] आहे तें स्थान कोण जाणतो. "तें स्थान सांगा" असा भाव आहे ॥२५॥.

टिप्पणें—"मेधया":—"मेधा" म्हणजे बुद्धि असाच अर्थ इतरांनी केला आहे पण तो बरोबर नाही; कारण तो "दृश्यते त्वग्र्यया बुद्धया सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः" (वल्ली ३।१२) ह्या वचनाशीं विरुद्ध आहे. "मेधा" म्हणजे "यज्ञ" असा अर्थ केला पाहिजे. "यज्ञानें" आत्मा मिळत नाही असें अनेक ठिकाणीं म्हटलेंहि आहे (मुंडक १।२।७–९ आणि भगवद्गीता ११।४८, ५३ पहा). "मेध" हा शब्द यज्ञवाचक आहेच. "मेधा" शब्द यज्ञवाचकहि आहे असें आपट्यांच्या कोशावरून दिसतें.

तेविसाव्या श्लोकाच्या द्वितीयार्धाचा श्री शंकराचार्यांनी वेडावाकडा अन्वय करून अर्थ केला आहे. कारण सरळ अन्वयाचा अर्थ आम्ही वर दिला आहे तसा होतो आणि तो "दृश्यते त्वग्र्यया बुद्धया सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः" ह्याशीं विरुद्ध दिसतो; शिवाय "आत्मज्ञान" होणें हें केवळ त्या परमात्म्याच्या खुषीवर असेल तर जीवाच्या प्रयत्नाला अर्थच रहात नाही, म्हणून श्री शंकराचार्यांनी तसा अर्थ केला असें दिसतें. परंतु आम्ही केलेला सरळ अर्थ "दृश्यते त्वग्र्यया बुद्धया" इत्यादि वचनांशीं व जीवाच्या प्रयत्नाशींहि विरुद्ध नाही. कारण कोणासहि परमात्मज्ञान करून देणारी अग्र्य बुद्धि देणें हें परमात्म्याच्या स्वाधीनचीच गोष्ट आहे हेंच सांगण्याचा ह्या श्लोकाचा उद्देश आहे. हें सांगणें, परमात्म्यानें दिलेल्या बुद्धीच्या प्रयत्नानें परमात्मज्ञान होतें ह्याशीं विरुद्ध नाही. ज्याला परमात्मा निवडतो त्याला तो श्रेष्ठ बुद्धि देतो व त्या बुद्धीच्या प्रयत्नानें आत्मज्ञान होतें असें म्हणून ह्याविरुद्ध भासणाऱ्या वचनांचा मेळ घालतां येतो. भगवद्गीतेंतहि "ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते" ह्या वचनांत असेंच म्हटलें आहे.

चोविसाव्या श्लोकांत "आत्मज्ञान" व आत्मप्राप्ति ह्या दोन भिन्न गोष्टी मानल्या आहेत. आत्म्याचें यथार्थ-ज्ञान झाल्यावर तें वर्तनांत आणून आत्यंतिक आनंदाचा अनुभव घेणें ह्यालाच आत्मप्राप्ति असें म्हटलें आहे. व्याससूत्रें अ. ४।१ पा. यावरील आमचें भाष्य पहा. ही आत्मप्राप्ति अर्थातच सत्कर्मांनी शरीरस्वास्थ्य प्राप्त करून घेऊन विषयानंदत्याग केल्यानें, स्वानंदभावनेनें, व केवळ मानसिक इच्छा टाकून दिल्यानें होईल हें उघड आहे आणि हेंच ह्या श्लोकांत सांगितलें आहे. कर्तव्यकर्मांचा त्याग हेंच येथें दुश्चरित मानलें आहे. "तस्यै तपो दमः-कर्मेति प्रतिष्ठा" ह्या केनांतील वचनांतहि आत्मज्ञान झाल्यावर तें वर्तनांत आणलें पाहिजे हेंच सांगितलें आहे.

ह्या श्लोकांतील "प्रज्ञान" ह्याचा अर्थ कोणीं श्रवणजनित ज्ञान असा करतात, पण तो चूक आहे. कारण तसा अर्थाचे विशेषण त्या शब्दास कोणतेंच लाविलेलें नाही. 'प्र' हा उपसर्गच त्या अर्थाला विरोधी आहे. 'प्रज्ञान' म्हणजे प्रत्यक्ष स्वबुद्धिनिर्णयानें झालेलें ज्ञान हाच अर्थ होऊं शकतो. श्री शंकराचार्यांनी "प्रज्ञान" ह्याचा अर्थ आमच्या अर्थासारखा मानला आहे; तथापि हें "प्रज्ञान" झाल्यावर कोणतेंच कर्तव्य शिल्लक रहात नाही व आत्मप्राप्ति होते असा त्यांचा सिद्धांत असल्यामुळे त्याशीं जुळण्याकरितां श्लोकाचा अर्थ त्यांनी आमच्या अर्थाहून निराळा केला आहे. त्यांचा अर्थ असा आहे की "दुश्चरित टाकून देणारा, शांत, समाहित, आणि शांत-मानस जो असतो त्यालाच सद्गुरुच्या उपदेशानें प्रज्ञान प्राप्त होतें" पण हें बरोबर नाही; कारण "दृश्यते त्वग्र्यया बुद्धया" ह्या वचनाप्रमाणें दुश्चरितालाहि त्याच्या तीक्ष्ण बुद्धीच्या साधनानें आत्मज्ञान होईलच. आत्मज्ञान झाल्यावर त्याप्रमाणें वागल्यानेंच आत्मप्राप्ति म्हणजे आत्मानंदप्राप्ति होते हाच ह्या श्लोकाचा अर्थ आहे. व तो उपनिषदांतील इतर वचनांशीं जुळतो. श्री शंकराचार्यांच्या अर्थाला श्लोकांतील 'अपि' हा शब्द बाधक आहे. कारण त्यानें असा अर्थ होतो की प्रज्ञान मिळविलें तरी दुश्चरितादिदुर्गुणाच्या मनुष्यास आत्मप्राप्ति होत नाही. 'वा' शब्दहि त्यांच्या अर्थास बाधक आहे. त्यांनी त्याचा अर्थ 'च'च्या अर्थासारखा केला आहे.

'ब्रह्म', 'क्षत्र' 'मृत्यु':—पंचविसाव्या श्लोकांत हे शब्द परोक्षवादानें अर्थ सांगण्याकरिता योजलेले स्पष्ट

(पुढील मजकूर पान ६ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धर्माजी भोसल्याचा पोवाडा

दे. गो. लांडगे

नागपूरप्रांतीं तुंबडीवाले म्हणून कांही पोवाडे गाणारे आहेत. त्यांच्या तोंडी हा पोवाडा कोणी ऐकला असल्याचा संभव आहे. त्यांना ह्यांत नवलाई वाटणार नाही. पण तो लिखितरूपांत श्री. दे. गो. लांडगे यांना उपलब्ध झाला. ह्यांनी तो उतरविला. तो जशाच्या तसा प्रसिद्ध करीत आहोत. पोवाडयाचें स्पष्टीकरण करणारें त्यांचें विवेचन पोवाडयाच्या शेवटीं दिलें आहे. या पोवाडयाचें ऐतिहासिक दृष्टया मूल्य तज्ज्ञांनी ठरवावें.

—संपादक

कलियेवगाचा फेरा देवा कैसा वरतला
कोन्या मुलकी होता फिरंगा या मुलकी आला ।।धृ।।
नानासाहेबाचा मुक्तकाळ काशीमधे झाला
रघुजी बुवाचा मुक्तकाळ नागपुरी झाला
रघुजी मेले खुशाल आले पाहा त्या धर्म्याला
वटकिनच्या धर्म्याने मोठा फितुर मांडला

सव्वामन सोन्याची बेडी केली आपा राजाला
दो धडया चांदीची बेडी केली गुजाबा दादाला
अंबागडचा किल्ला नेमिला त्याच्या दैवाला
आवतन सांगावया राजाच्या महालाशि आला
आमच्या घरीं श्राद्ध बाबा यावे जेवायाला
लेकराची जात राजा हो म्हून बोलीला
वरं आहे धर्माजी दादा येऊ जेवायाला
तसाच तो धर्माजी आपल्या महालाशि गेला
दुफारच्या पाहारी त्यान आपला हलकारा पाठविला
चाला हो राजेश्वरो स्वैंपाक थंडा तो झाला
।। कलियोगाचा ।।१।।

आपा राजा काय वोले पीलेवानाला
बलात्र माझा मुकना हत्ती महाने माह्यलाला
तसाच पिलेवानदादा धावत चालला
मुकन्या हत्यावरते त्याने हौदा ती कसला
(येथे हत्तीच्या सजावटीचें वर्णन आहे)
हत्याचा हो ठाठ पाहुन राजा खूष झाला
मग आपा राजाने काय केले सांगतो तुम्हाला
।। कलियोगाचा ।। २ ।।

हिऱ्याचा मुगुट त्याने शिरावर बांधला
मोतीयाचा तुरा खोसिला त्याने मुंडाशाला
(येथे आपाराजांच्या अलंकारांचें वर्णन आहे)
नगारखान्याच्या मोहर हत्याचा घंटा वाजला
वसला होता बळी राजा चंदन खोलीला
बाळ राजा होता तपेसी समजले त्याला
बाळा राजा काय बोले बारीदाराला
आपा राजा कोठ जाते सांगा आम्हाला
धर्माजीच्या महाली राजा जाव्हे भोजनाला
जारे बारीदारा वर्तमान सांग राजाला

उपनिशदर्थव्याख्या (पान ५ वरून)

दिसतात. ब्रह्म म्हणजे ब्राह्मण व क्षत्र 'म्हणजे क्षत्रिय हा शाब्दिक अर्थ आहे. ब्राह्मण हा बुद्धीचा किंवा ज्ञानाचा प्रतीक आहे आणि क्षत्रिय हा शक्तीचा किंवा कर्माचा प्रतीक आहे. त्याप्रमाणे मृत्यु हा निष्क्रियतेचा म्हणजे निद्रेचा प्रतीक होय. कारण मृत्यु हा महानिद्राच मानला जातो. ओदन म्हणजे अन्न व उपसेचन म्हणजे त्याबरोबर प्यावयाचें पाणी, अनुपान. ओदन व उपसेचन ह्यांचा "आनंदानुभवाचें साधन" असा अर्थ परोक्षवादविवरणाने ठरतो.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसाच बारीदारदादा धावत चालिला
नगारखान्याच्या मोहर राजाचा हत्ती धरला
हात जोडून बारीदार उभा राहिला
एक विनंती आहे साहेबा सांगतो तुम्हाला
बाळा राजासी भेट घ्यावे मग जावे जेवायाला
भेटीच नांव घेता हत्ती बैसविला
चालता बोलता आला चंदन खोलीला
बाळा राजाच्या चरणावर हात ठेवीला ।।३।।
बाळा राजा काय बोले आपा राजाला
माझी आंधळयाची काडी राघोबा नको जाऊं जेवायला
सव्वामन सोन्याची बेडी केली हे तूजला
दो घडया चांदिची बेडी केली गुजाबादादाला
अंबागडचा किल्ला नेमला तुमच्या दैवाला
किल्ल्याचे नांव घेता राजा रडू लागला
तीन महिने नाही झाले रघूजी मेल्याला
आमच्या वरत देव दादा कैसा कोपला
तेव्हां धर्माजी पहा राजाला बोलावू चालला
हनुमंत खिडकीपाशी येऊन उभा राहिला
चला हो राजेश्वरी सैपाक थंडा हो झाला
आपा राजा काय बोले त्या धर्माजीला
सावकाश वाटत नाही माझ्या जीवाला
बाळा राजा काय बोले आपा राजाला
आंधळा भोंगळा नका नेऊ माझ्या जीवाला
बसल्या बसल्या आग लावीन कलकत्याला
आपा राजा काय बोले त्या धर्माजीला
यावे धर्माजी दादा येऊन बसावे गादीला
श्रीमंताचा आहे पलंग कसा बसू राजा
काहीं अंदेशा नका आनू आपल्या जीवाला
रघूजीच्या ठायी राघोबा नेमतो तुम्हाला
मोठेपन दिले होते त्या धर्माजीला
बहुमानाने तो धर्माजी पलंगी बैसविला
पलंगावर बसतांना तो मनामध्ये फूगला
आज बसलो पलंगावरती उद्या बसीन गादीला ।।४।।
आपा राजा काय बोलला त्या धर्माजीला
तुमच्या हातच्या मुंद्या द्याव्या आम्हाला
तुमच्या पेक्षा नाही, रावोबा, ह्या मुंद्या मोठ्या
तसाच काढून मुंद्या राजाच्या हाता मंधीं देल्या
जवळ होता खडसकार त्याने डोळा मारला
खडसकाराचा माणूस मेला कसा घात केला
आपा राजा काय बोले त्या धर्माजीला
कोठे जाता धर्माजी बाबा सांगा आम्हाला
मला लागली पिसाब राजा जातो पिसाबाला
कशाची पिशाब लागली रे धर्म्या तुजला
झटका मारुन तो धर्माजी खाली बैसविला ।।५।।

सव्वा मनाची बेडी केली कवनाला
अंबागडचा किल्ला नेमला कोणाच्या दैवाला
कोण सांगते लबाडलुच्चा तो × × ×
नानासाहेबाच्या गळयाची आन आहे मजला
नानाव नाव घेतां राजा खवळला
उठरे मन्नूभाई खेटर मारू धर्म्याला
दोन खेटरं साहेबा होते तुमच्या हुकुमाचे
तिसर खेटर माझ्या मनुभाईचे
कारे बेट्या मुसलमाना मगरमस्त झाला
तिसर खेटर कोणाच्या हुकमान मारला
तीन वर्स मुलकी याने पेंढारा सोडला
तलफ नाही देतो म्हणूनि खेटर मारला
तुमचा हुकुम होईल दहापांच मारितो याला ।।६।।

आपा राजा काय बोले बारेदाराला
धर्माजीच्या उपडा मिशा ऐसा बोलिला
मिशाचं नांव घेता धर्माजी पल्यावर आला
कारे काहाडते डोळे लेकरा कोण भेते तुला
नाही भेलो तुझ्या नाही मोठ्या रघूजीला
तीन वर्सं मुलकी म्यां पेंढारा सोडीला
पेंढाऱ्याची लूट आहे तळेगावच्या तळयाला
या गोष्टीचा उत्तर बाळा राजाने ऐकीला
बाळा राजा काय बोले आपा राजाला
आज ठेवशील धर्म्याला उद्या काळ होइल तुला
मीठ पीठ दळत होत त्याच वेळेला
तेरा रोज झाले होते मीठा पीठाला
बदामीची भाकर ज्याला न मिळे खायाला
परसराम जमादारान त्याच वेळेला
बदामीची करून दिल्ली भाकर खायाला
बदामीची भाकर खाता प्रान निघून गेला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुऱ्याच्या मौतीन पाहा धर्माजी मरून गेला
बोवा फरदाच गिरड लुटून दया नाही त्याला ।।७।।

आपाराजा बाळाराजा मनसोबा केला
चला जाऊ राजा तळेगावच्या तळचाला
अरबाचे पलटण घेऊन राजा चालला
तळेगावच्या तळचा जी वरतें घेवोनिया गेला
तळेगावच्या तळचाला त्याने खांदविला
अठरा लक्ष हंडा होता एका बाजूला
बावण लक्ष हंडा होता दुसऱ्या बाजूला
तीस लक्ष सरद्याचे मुखरे एका टाक्याला
अठरा लक्ष जोडव चांदीच एका टाक्याला
रुपये मोहरा ढवू पैसा गणती नाहि त्याला
धर्माजीचा रंगित बंगला लाल बागाला
पाच खंबे सोन्याचे होते त्याच्या बंगल्याला
धर्माजीचा बंगला उचलुनि महाली आणीला
पाच खंबे सोन्याचे लावले देवघराला
तही पासून मनभटाचा पाहरा लागला ।।८।।

या पोवाड्याचे ३ भाग आहेत. त्यांपैकी परसोजी भोसल्यासंबंधीचा अंश चांदा येथे निघत असलेल्या मधुवन नावाच्या मासिकाच्या जानेवारी १९५२ च्या अंकांत प्रसिद्ध झाला. आज हा धर्माजी भोसल्यासंबंधीचा दुसरा भाग सादर करीत आहें.

पोवाड्यावरून असें दिसून येईल की कवीने धर्माजीसंबंधी कांही विधानें केलीं आहेत. तो वटकीच्या पोटचा होता. आप्पासाहेबाला तुरुंगांत घालून राज्याची गादी स्वतः पटकविण्याचा त्याचा विचार होता. तो पेंढारी असून त्याच्या जवळ कल्पनातीत द्रव्य होतें. उलट आप्पासाहेबाविषयीं मात्र कवीच्या मनांत पूर्ण सहानुभूति असून तो आंधळ्या राजाचा खरा हितचिंतक असून राजाचीहि आप्पासाहेबाविषयीं तेवढीच श्रद्धा व भक्ति होती; अर्थात् धर्माजीचा आप्पासाहेबाने अन्यायाने खून केल्याबद्दल कवीला किंचित्हि विषाद वाटल्याचें दिसत नाही.

अलीकडे मध्यप्रदेश शासनाने नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्डचे तीन खंड प्रसिद्ध केले आहेत. त्यांत १७९९ ते १८१६ एप्रिल पर्यंतचा पत्रव्यवहार मुद्रित केला आहे. धर्माजीच्या खुनाचाहि प्रसंग १८१६ एप्रिल मधला होय. धर्माजी जर एवढा राज्यपदाचा लोभी असता तर त्याच्या कारस्थानाविषयीं वरील खंडांत कोठे तरी उल्लेख आला असता. जींत १८०९ अखेर पर्यंतची हकीकत आली आहे अशी मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या संग्रहीं एक अप्रकाशित बखर आहे तींतहि या प्रबळ पण दुष्ट व्यक्तीचा कोठे उल्लेख नाही. रेसिडेन्सी रेकार्ड वरून द्वितीय रघूजी पेंढाऱ्यांचा मोड करण्यासाठी किती झटत होता हें दिसून येतें. त्याचे प्रमुख सरदार पेंढाऱ्यांना तोंड देत असतां स्वतः रघूजी धर्माजी सारखा पेंढारी पोशील व पोसल्यासहि त्याला राज्य पटकविण्या इतपत महत्वाकांक्षेला पोषक अशी राज्यांत परिस्थिति असू शकेल हें संभवत नाही. गुप्ते बखरींत धर्माजी विषयीं फक्त दोनच उल्लेख आहेत. पृ. २१३ वर (प्रत १९३६) रघूजी, नारायण यशवंतला धर्माजीसमोर एकांतांत असें विचारतांना दिसतो कीं इंग्रजांचा पेंढाऱ्याचा मोड करण्यासंबंधी जो एवढा आग्रह चालू आहे त्याचा काय बरें अर्थ असेल." एवढेंच नव्हे तर आपल्या आईचीहि सल्ला घेण्याबाबत नारायण यशवंतरावर धर्माजीचीहि राजा योजना करतो. पृ. २३१ व २३२ वर पुनः धर्माजीचा उल्लेख आला आहे. त्यांत "तो रघुजीचा लेकवळा असून तो बाकाबाईच्या चित्तांत असल्यामुळे त्याचेशीं आप्पासाहेबाने कलह मांडला व त्याला दगा करून कैद केलें" असा उल्लेख केला आहे. तो पेंढारी होता, असें मात्र कोठे म्हटल्याचें नमूद नाही. फार काय ज्या मन्नू सुभेदाराने धर्माजीला खेटरें मारून एवढ्या वजनदार गृहस्थाची बेअब्रू केल्याचा उल्लेख पोवाड्यांत आहे त्यालाच पुढे आप्पासाहेबाने 'मारहाण करून चंद्रपुरास बेहुरमत करून ठेविलें असा उपद्रव बहुत झाला' असें म्हटलें आहे. (पहा गुप्ते पृ. २३३) यानंतर नागपूरच्या ऐतिहासिक कागदपत्रांचा पुरावा विचारांत घेतला पाहिजे. (पहा पृ. ८० ते ८७) द्वितीय रघूजी आसन्नमरण असतां गादीच्या वारसदारीसंबंधीं चर्चा झाल्याचें नमूद आहे. त्या प्रसंगीं धर्माजीने राजाला एवढीच विनंती केली की, "बाळासाहेब गादीस वारस खरे. पण आप्पासाहेबास कांही आज्ञा करावी." यावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्तर अस्लें की, " त्याचा बंदोबस्त त्याच्या वडिलापासूनच आहे; त्याचा दौलतीशीं संबंध नाही " परंतु पुढे बाळासाहेबाचा एवढा जिव्हाळा बाळगणारा म्हणून जें आप्पासाहेबाला पोवाड्यांत गौरविलें आहे त्याच आप्पासाहेबावर बाळासाहेबाचा खून केल्याचा वहीम प्रकट झाल्याचें दिसून येतें. (पहा पृ. ४०३ नागपूर प्रांताचा इतिहास) अ‍ॅकवर्थने प्रसिद्ध केलेल्या परसोजीच्या पोवाड्यांत आप्पासाहेबाने परसोजीचा खून केल्याचें स्पष्टच म्हटलें आहे. उलट उपरोक्त ऐतिहासिक पत्रांत क्रमांक ५२ ची जी टीप आहे तींत धर्माजी हा द्वितीय रघुजीचा दासीपुत्र असून तो बाकाबाईच्या पक्षाचा असल्याचें व त्याचेजवळ खाजगी व सरकारी मिळून १ कोट रुपये असल्याचेंहि सांगितलें आहे. तसेंच 'रघूजीच्या कारभाराचे अखेरीस त्याने धामधूम करून पेंढाऱ्याप्रमाणे पैसा उपटला? असेंहि म्हटलें आहे व त्याचा अंत ११-४-१८१८ ला म्हणजे त्याला कैद केल्यावर २४ दिवसांनी झाल्याचे नमूद आहे. धर्माजीला धामधुमीबद्दल सर्वस्वी दोष देणें गैर आहे. याकरिता रघूजीची १८०३ नंतरची बेचैनी व सांपत्तिक स्थिति विचारांत घेतली पाहिजे. एवढेंच नव्हे तर त्याने पैसा उकळण्याकरिता कसकसे उपाय केले हेंहि लक्षांत आणिलें पाहिजे. या बाबतींत विशेषतः परकीय लेखकांचे अभिप्राय विचारांत घेतल्यास या धामधुमीबद्दल धर्माजीस जबाबदार धरणें उचित होणार नाही.

बखरीच्या आधींचें म्हणजे १८११ चें एक सरकारी रीत्या प्रसिद्ध झालेलें पुस्तक आहे. त्यांत धर्माजी हा "Was in charge of chauree" (चावडी) असेंच केवळ म्हटलें आहे. तो पेंढारी होता असें म्हटलेलें नाही. त्याच्याहि आधीचा पुरावा म्हणजे खुद्द माऊन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन्चा तो आपल्या २४ मार्च १८०४ च्या "List of ministers at Nagpur Court" मध्ये धर्माजी भोसल्याचें "Musahib on Companion. Dharmajee is a great favourite; has a charge in the paga and is in possession of a great deal of Country" असें म्हणतो.

या सर्व गोष्टीचा विचार करतां धर्माजी भोसले हा पेंढारी नसून एक कर्तृत्ववान् व स्वामिनिष्ठ पुरुष होता, हें सिद्ध होतें. उलट आप्पासाहेबाला त्याच्या संबंधीं तेवढी सहानुभूति वाटणें शक्य नाही. त्याकाळीं समाजांत एक प्रकारचें शैथिल्य व निष्क्रियत्व उत्पन्न झाल्यामुळे परसोजीला 'तपेसी' म्हणण्यांत कवीचें भोळेपण मात्र दिसून येतें. बाळाजीला तरखेज करण्याचा रघूजीने आटोकाट प्रयत्न केला परंतु तो अनेक कारणास्तव असफल ठरला. तो गादीवर बसला तेव्हा चांगला ३८ वर्षांचा होता. आप्पासाहेब मात्र २० वर्षांचा होता. म्हणून तर धूर्त जेंकिन्सने त्याला मायाजाळांत फसवून मध्यरात्रीं एका बोळांत गुप्त रीतीने तैनाती तहावर त्याचेकडून स्वाक्षरी करवून घेतली व रघूजीच्या ३० वर्षाच्या नकाराचें रूपान्तर होकारांत करून घेतलें. किंवहुना जेंकिन्सची आतून स्वार्थी फूस असल्यामुळेच धर्माजी, बाकाबाई व गुजाबा दादा गुजर व त्यांचे वजनदार सहाय्यकर्ते यांचा विरोध करणें आप्पासाहेबाला शक्य झालें व प्रथम धर्माजीचा व नंतर परसोजीचा बळी घेणें शक्य झालें. गुजाबा दादाने भिऊन तर स्वच्छ इंग्रजांचाच आश्रय घेतला व आप्पासाहेबांचा मार्ग निष्कंटक केला. धर्माजीला निदान 'जे तुमचे अन्तःकर्णी दौलत अंग्रेजाचे घरांत घालावी ऐसे दिसते' असें इंग्रजास फितूर झालेल्या नारायण गोपाळ पंडितजीस बोलण्याचें तरी धैर्य होतें.

नागपुरांतील शाहिरी वाङ्मय हा स्वतंत्र विषय आहे. प्रस्तुत पोवाडा हा बापु मोहिऱ्याने केला असें म्हटलें आहे. यांत नकलतांना चूक झालेली दिसते. मोहिरेचे ऐवजी 'मोहर' किंवा 'मराठे' असें असलें पाहिजे. कारण अ‍ॅकवर्थच्या पोवाड्यांत 'पोवाडा बापूने केला' 'बापू मराठा म्हणे म्होर युद्ध होईल भारी' असें म्हटलें आहे व हा पोवाडा व माझ्या जवळच्या पोवाड्यांचा जो आप्पासाहेबाबद्दल अंश आहे त्यांत बरेंच साम्य आहे. हा कवि केव्हा झाला हें जरी निश्चित सांगतां येत नसलें तरी तो तृतीय रघूजीला राज्याधिकार मिळण्यापूर्वीच झाला हें [illegible]त धरणें चुकीचें होणार नाही. या दृष्टीने हा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोवाडा १८१९ ते १८२९ दरम्यान केव्हा तरी लिहिला गेला असावा.

वस्तुतः लेखक कोणी तरी शेतकरी मराठा दिसतो व तोहि राज्यांत वापरलेला माणूस दिसत नाही. तर वर्ण्य विषयाचें त्याने केलें तसें चित्रण केलें नसतें. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की महाराष्ट्रांत व उत्तरेंत इतकीं मराठ्यांचीं राज्यें झालीं व इतके पराक्रमी पुरुष झाले परंतु नागपूरकर भोसल्यांच्या इतिहासा-इतकी कोठेच उपेक्षा झालेली दिसून येत नाही. भोसलेच काय, महाराष्ट्र, विदर्भ, महाकोसल किंवा जबलपूर प्रांतांच्या इतिहासाच्या ज्ञानाच्या बाबतींतहि आमच्या प्रांतवासीयांचें अज्ञान आहे. म्हणून गतेतिहा-सावरून मिळणाऱ्या स्फूर्ति आम्ही वंचित होत आहोंत हें खेदाने म्हणावें लागतें.

पाणी खारट पिऊन—

(छंद—देवीवर)

निळ्या धूसर धुन्धींत, ढग आले रेंगाळत
पाहूनि त्यां अकल्पित, आला सागर रङ्गांत
जळ खारट खारट, दिलें ओंजळीं भरून
मेघांनीही गद्गदून, घोट घेतला पिऊन
दिला तृप्तीचा ढेकर, जाऊं लागले झिङ्गून
जणु शबरीची बोरें
राम चालले चाखून

श्रान्त, क्लान्त अवनीचे, ऊन उसासे झोम्बले
द्रव येवून मेघही, क्षणि त्याच पाझरले
स्वतः असतां समृद्ध, धरणीचें निर्जीवत्व—
—कसें रुचावें मेघांना ? स्वतःचेंच निष्क्रीयत्व !
रखरखीत, व्याकूळ, त्रस्त पाहून धरणी
जणु वाटून लाजव
काळवंडले वदनीं !

चमकली वीज, आणि गरजले मेघ वर
सरसर आल्या सरी पावसाच्या पृथ्वीवर
शहारली वसुंधरा, झाली सतेज न्हावून
जरीपदरी शालूच, उभी हिरवा नेसून
दूध दुभतें विपुल, पिकें येती फोफावून
जणु यक्षिणीची कांडी
टाको सारें पालटून ।

पाणी खारट पिऊन, गोड पाण्याचा वर्षाव
यांत कोणतें नवल ? हा तो कवीचा स्वभाव
युक्तायुक्त अवघेंच बुद्धिबळें भरडून
सत्य, सुन्दर, पोषक, कवि देई पाखडून ।
आत्म-दानानें एकाच्या, जीव-सम्भव दुज्यांत
जात्यातलें रडतात
सुपांतले हासतात ।

अवनीच्या लोचनांत कृतज्ञता ओथम्बली
हृदयाचें मोल देण्यां सज्ज केली श्रद्धाञ्जली ।
मेघ मुरले महींत । पण आपुल्या तोऱ्यांत —
—सृष्टि स्वतःस न्याहाळीं गगनाच्या आरशांत
जग जगते मरणीं । इतिहास सनातन ।
अस्तामुळेच रवीच्या
उद्या उषेचें दर्शन ।

—अनंत माधव देसाई

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्कृत व्याकरणांतील परिभाषा—(सिद्धांत) त्यांचें कार्य व व्याप्ती

म. दा. साठे, एम्. ए.

प्रास्ताविक—मराठी भाषा जरी फार प्राचीन असली तरी तिच्या व्याकरणाचा अर्वाचीन आरंभ काल सामान्यपणें कै. दादोबा पांडुरंग यांच्यापासूनच सुरू होतो. बाळशास्त्री जांभेकर यांनीही थोडे फार परिश्रम केलेले दिसतात. तरी पण मराठी वैयाकरण हाताच्या बोटांवरच मोजतां येतील. दादोबा पांडुरंग, राजवाडे, दामले, रामभाऊ जोशी, कृ. पां. कुळकर्णी, गोविंदराव मोडक वगैरेंची यांत प्रामुख्याने गणना होते. इतर जे आहेत ते केवळ शालोपयोगी व्याकरणाचे संकलनकार आहेत. त्या मानानें संस्कृत व्याकरणावर शेकडो ग्रंथ झाले. त्यांत मूलभूत जरी थोडे असले तरी त्यावरील वृत्ति, भाष्य, टीका, प्रबंध, परिभाषा, अनेक शेखर व मंजूषा असून त्यांनी भाषेच्या व्याकरणाची मूलभूत तत्त्वें पिंजून पिंजून काढलीं आहेत. त्यांत परिभाषांवर (Rules of interpretation and application) जे ग्रंथ आहेत त्यांचें महत्त्व विशेष आहे. मराठी व्याकरणावर असा परिभाषा ग्रंथ एकहि नाही. संस्कृत व्याकरणावर नागोजी भट्टाने 'परिभाषेंदुशेखर' ग्रंथ लिहून फार मोठी कामगिरी केली आहे. संस्कृत व्याकरणांत परिभाषांनी केवढें मोठें कार्य केलें तें पाहणें उद्‌बोधक असल्याने त्यासंबंधी चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे. मराठी भाषेच्या व्याकरणावर असा परिभाषा ग्रंथ लिहिणारा एकादा 'नागोजी भट्ट' जन्माला येईल तो सुदिन !

संस्कृत व्याकरणाची त्रिमुर्ति— पाणिनी, कात्यायन आणि पतंजलि प्रसिद्ध आहेत. संस्कृत व्याकरणांत पाणिनीच्या 'अष्टाध्यायी'लावेदां इतकें प्रामाण्य आहे. वेदांनंतर अनेक ग्रंथ झाले पण त्या सर्व ग्रंथकारांनी श्रुतिप्रामाण्य मानलें. अर्थात जे अवैदिक आहेत त्यांची गोष्ट वेगळी. ब्रह्मसूत्रें, उपनिषदें व गीता व त्यावरील अनेक भाष्यें यांत श्रुतिप्रामाण्य मानलें जातें. जर क्वचित् वेदविरुद्ध अर्थ निघूं लागला तर वेदार्थाच्या एकवाक्यतेकडे अर्थ जुळवून घेण्याची धडपड व खटपट दिसून येते. तद्वतच पाणिनीच्या सूत्रांचें आहे. त्याने घालून दिलेल्या सिद्धान्तांविरुद्ध बोलणें, लिहिणें व विपरीत ध्वनि काढणें हें कधी मान्य होणार नाही. वार्तिककारांनी सूत्रांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी किंवा त्यांत भर घालण्यासाठी वार्तिकें लिहिलीं तर भाष्यकार पतंजलीने पाणिनीच्या सूत्रांचें विवरण करून त्यांविरुद्ध असलेल्या सर्व आक्षेपांचें खंडण केलें. 'यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्' या उक्तीप्रमाणे भाष्यकार पतंजलीच्या वचनांना अष्टाध्यायीइतकें-किंबहुना काकणभर अधिकच-प्रामाण्य आलें.

कांही शास्त्रार्थ, अथवा व्याकरणविषयक चर्चा किंवा वादविवाद पंडितांच्या सभेंत निघाला तर प्रतिपक्षाला गप्प बसविण्यास 'इति भाष्यकारः' अथवा 'इति भाष्ये', 'इत्यस्मिन् सूत्रे भाष्ये स्पष्टम्', 'इति भाष्यविरुद्धम्' इत्यादि प्रतिपक्षाच्या तोंडावर फेकलें की झालें ! कोणी कितीहि विद्वान झाला तरी भाष्यकाराच्या विरुद्ध बोलण्याची त्याची छाती नाही. 'भाष्यकार असें म्हणत असतील पण तें मानलेंच पाहिजे असें कोणी सांगितलें ?' असें म्हणणें म्हणजे वेद हे पौरुषेय आहेत व तेहि चुकीला पात्र आहेत असें म्हणण्याइतकें पाप समजलें जातें. भाष्यावर अनेक टीका आहेत. त्यांत भर्तृहरीची 'वाक्यप्रदीपिका', (याची एकुलती एक प्रत म. म. प्रा. काशिनाथपंत अभ्यंकर यांनी महाप्रयासाने मिळविली आहे. ती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जर्मनींत होती.) याशिवाय कैयटाचा 'प्रदीप' व त्यावर नागोजीभट्टांचा 'उद्योत' या प्रसिद्ध आहेत.

भाष्यकार पतंजलीने सूत्रांचा अर्थ लावण्याकरिता व तो स्पष्ट करण्याकरिता पाणिनीच्या सूत्रांच्या आधारें, कांही लौकिक न्यायावर आधारलेले तर कांही युक्तिसिद्ध असे सिद्धान्त मांडले. याच सिद्धान्तांना 'परिभाषा' असें म्हणतात. 'परितो भाष्यते इति परिभाषा' अशी 'परिभाषा' शब्दाची व्युत्पत्ति आहे. 'परितो व्यापृतां भाषां परिभाषां प्रचक्षते' अशी तिची व्याख्या आहे. इंग्रजींत याचा अर्थ Rules of Interpretation असा करता येईल.

परिभाषांचें कार्य—डॉ. किलहॉर्न म्हणतो, "They are maxims intended to guide aud assist in the interpretation and application of the rules of Panini's grammar." पाणिनीच्या अष्टाध्यायींतील चार हजार सूत्रें अगदी लहान. त्या सूत्रांचा अर्थ समजावून देण्याच्या कामीं जे सर्वसाधारण नियम घालून दिले आहेत त्यांना परिभाषा म्हणतात. एकच परिभाषा तिच्या लक्षणांनी युक्त असलेल्या अनेक सूत्रांचा अर्थ स्पष्ट करून निश्चित करून देण्याच्या उपयोगी पडत असल्यामुळे तिला 'परितो भाष्यते इति परिभाषा' असें म्हणतात. असा अर्थ असल्याने भाष्यकाराने निषेधसूत्रांना देखील गौण व्यवहाराने परिभाषा मानलें आहे. कारण ज्या विधिसूत्रांचा निषेवक सूत्रें निषेध करतात तीं विधिसूत्रें कोठे प्रवृत्त व्हावीं व कोठे होऊं नयेत हें ठरविण्याच्या कामीं तीं निषेधसूत्रें उपयोगी पडतात. तात्पर्य परिभाषांचें तीन प्रकारचें कार्य आहे. (१) सूत्रांचा अर्थ लावण्यास उपयुक्त; (२) दोन सूत्रांत विरोध आला असतां त्याचा परिहार करणें व (३) शिष्टसंमत रूपें वा उदाहरणें साधण्याकरिता उपयोगी पडणें.

या परिभाषांचा उद्‌गम व विकास पाहणें फार उद्‌बोधक होईल. पाणिनीचा अष्टाध्यायी ग्रंथ झाल्यानंतर कांही कालाने अशा परिभाषा तयार करण्याचा पहिला प्रयत्न व्याडीने केला. 'संग्रह'कार व्याडि व 'परिभाषासूचन' कर्ता व्याडि हा एकच असावा असें विद्वानांचें मत आहे. व्याडीने १४० परिभाषांचें परिगणन केलें असलें तरी ८७ परिभाषांवरच त्याने आपली 'वृत्ति' लिहिली आहे. हा ग्रंथ अप्रकाशित असून त्याच्या दोनच हस्तलिखित प्रती भांडारकर रिसर्च इंस्टिट्यूटमध्ये उपलब्ध आहेत. हा व्याडि पाणिनीनंतर पण भाष्यकार पतंजलिपूर्वीचा असावा. पतंजलीने या परिभाषांपैकी शेकडा ८० परिभाषांचा उल्लेख आपल्या भाष्यांत केला आहे. खुद्द पाणिनीनेच सूत्ररूपाने सुमारें ३० परिभाषा दिल्या आहेत. त्यांपैकी उदाहरणार्थ 'तस्मादित्युत्तरस्य' १.१.६७, 'तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य' १.१.६६, 'अलोऽन्त्यस्य' १.१.५२, 'आदेः परस्य' १.१.५४ इत्यादि देतां येतील. वार्तिककारांनी त्यांत ३०-४० परिभाषांची भर घातली. पण पाणिनीनंतर सुमारें तीनशे वर्षांनी पतंजलीने महाभाष्य लिहिलें तेव्हा त्यामध्ये सूत्रांचें विवेचन करतांना त्याने ३०० ते ४०० परिभाषा उपयोगांत आणल्या. मात्र त्याने यांचें परिगणन केलें नाही किंवा त्यावर वेगळा ग्रंथ लिहिला नाही.

चांद्र, कातंत्र, कालाप वगैरे व्याकरणांत परिभाषा आढळतात. जरी त्या व्याकरणांचीं सूत्रें भिन्न असलीं तरी अर्थ लावण्याकरिता त्यांनी अशाच परिभाषांचा उपयोग केला आहे.

परिभाषांवर आज अत्यंत प्रसिद्ध व सर्व वैयाकरणांच्या अध्ययनांत असलेला ग्रंथ म्हणजे नागोजीभट्टांचा अथवा नागेशाचा 'परिभाषेंदुशेखर' होय. नागेशाचा जन्मकाल सुमारें सन १६७४ आहे व तो शतायुषी होता. हा तासगावचा 'काळे' नांवाचा देशस्थ ऋग्वेदी महाराष्ट्रीय ब्राह्मण. या विद्वान ब्राह्मणाचें चरित्र अनेक आख्यायिकांनी भरलेलें आहे. पण त्या सांगण्याचें हें स्थल नव्हे. आज नागेशभट्टांचीच शिष्यपरंपरा महाराष्ट्रांत चालू आहे. त्याने हा ग्रंथ 'बालानां सुखबोधाय' म्हणून लिहिला !

परिभाषेंदुशेखर—

नागेशाने सर्व परिभाषांचें मंथन करून त्यांतील १३३ परिभाषांवर आपला 'परिभाषेंदुशेखर' ग्रंथ

अनुक्रमणिका
मराठीच्या विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिला.' या परिभाषा कोणत्या अनुक्रमानें घेतल्या हें पाहूं गेलें असतां बाराव्या शतकांत (सन ११७५) पुरुषोत्तमदेवाने जो ९५ परिभाषांचा 'परिभाषा पाठ' लिहिला त्यांतील अनुक्रमच घेतलेला आढळतो. त्यांत चार परिभाषा कमी करून व ४२ ची भर घालून एकंदर १३३ परिभाषांवर आपला ग्रंथ रचिला. पुरुषोत्तम-देवाने 'परिभाषावृत्ति' लिहून तिच्यामध्ये १४० परिभाषा अंतर्भूत केल्या आहेत. आता या दोन ग्रंथांचे पुरुषोत्तमदेव दोन होते की काय तें सांगतां येत नाही. पुरुषोत्तमदेवानंतर सीरदेवकृत 'परिभाषावृत्ति' हा ग्रंथ उपलब्ध आहे. डॉ. किलहॉर्नने परिभाषेंदुशेखराचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. त्यांतील दुसऱ्या भागांत शेवटीं सीरदेवकृत परिभाषा दिल्या असून त्यांची नागेशाने उद्धृत केलेल्या परिभाषांशीं तुलना केली आहे व पाठभेदहि दिले आहेत.

'परिभाषेंदुशेखर' हा ग्रंथ समजण्यास फार कठीण आहे. सिद्धान्त कौमुदी व निदान 'नवाह्निकी' भाष्याचें अध्ययन झाल्याशिवाय या ग्रंथाचें अर्थग्रहण यथार्थतया होणार नाही. त्या मानाने महाभाष्याची भाषा घरगुती व ओघवती असून खेळीमेळीच्या स्वरूपाची आहे. पण प्रस्तुत ग्रंथांत एकामागून एक आक्षेप 'किं च' या पदाने सुरुवात करून 'इति चेत् न' या शब्दसमूहाने त्याचा शेवट केला आहे. अर्थात् काठिन्यदोष असल्याने त्यावर टीकाहि अनेक झाल्या आहेत. व्याकरणग्रंथांवर या ग्रंथाइतक्या टीका क्वचितच असतील. कमींत कमी २५ टीका आज उपलब्ध आहेत. त्यांत कांहीं प्रकाशित आहेत. आज जी प्रसिद्ध यादी आहे त्यांत १०।१२ चाच उल्लेख आहे. पण इतरांची माहिती मिळाली असून त्यांत बऱ्याचशा म. म. प्रो. काशिनाथपंत अभ्यंकर यांच्या संग्रहांत आहेत. व संशोधकांच्या सोयीसाठी मी त्यांचीं नांवें व कर्ते येथे उद्धृत करीत आहें.

ग्रंथसंपत्ति—

१. वैद्यनाथ पायगुंडे-गदा (प्रकाशित); २. भैरवमिश्र-भैरवी (प्रकाशित); ३. राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर-त्रिपथगा वैष्णवी (प्रकाशित); ४. जयदेव मिश्र-विजया (प्रकाशित); ५ हरिशास्त्री भागवत-वाक्यार्थ चन्द्रिका (प्रकाशित); ६ गणपतिशास्त्री मोकाटे-तत्त्वप्रकाशिका (प्रकाशित); ७ नारायणशास्त्री गल-नागेशाशय निर्णय; ८ ब्रह्मानंद सरस्वती-चित्प्रभा; ९ शेषशर्मा-सर्वमंगला; १० भीम-परिभाषार्थमंजरी (भैमी); ११ शंकर-शांकरी; १२ वेणीमाधव शुक्ल-शास्त्रार्थकला; १३ अज्ञाकर्त्री; १४ तात्याशास्त्री पटवर्धन-भूति; १५ विष्णुशास्त्री भट-विष्णुभट्टी; १६ विष्णुशास्त्री भट-चिच्चंद्रिका; १७ राघवेंद्राचार्य-दूषक रदोद्भेदिनी; १८ राघवेंद्राचार्य (?) -अकांडतांडव; १९ म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर-तत्त्वादर्श; २० भास्करशास्त्री अभ्यंकर-भास्करी; २१ मन्नुदेव-शेषोद्धरण; २२ विश्वनाथ दंडिभट्ट-परिभाषेंदुचंद्रिका; २३ माधवाचार्य-तरंगिणी; २४ भीमाचार्य गलगली-भैमी; २५ गोविंदाचार्य अष्टपुत्रे-भावार्थदीपिका; २६ सदाशिवभट्ट-सदाशिव भट्टी; २७ लक्ष्मीनृसिंह-त्रिशिखा; २८ उदयशंकर-परिभाषाप्रदीपार्चि.

यांपैकीं कांही 'क्रोडपत्रें' म्हणजे टाचणें आहेत.

इतक्या 'टीका' होण्याचें कारण—वादविवादांत सभा जिंकण्यासाठी 'परिभाषेंदुशेखर' ग्रंथ फार उपयुक्त असल्याने प्रसिद्ध वैयाकरणांच्या घराण्यांत कोणी तरी टीका लिहीत असे. त्यांतील मर्मस्थानें गुप्त ठेवीत असत. त्या टीकांच्या नकला फक्त त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनाच मिळावयाच्या. अशाच दोन टीका पुण्याच्या भट घराण्यांत-माझ्या मातुलगृहीं-उपलब्ध असून त्या अप्रकाशित आहेत. विष्णुशास्त्री भटांनी लिहिलेल्या विणुभट्टी व चिच्चंद्रिका या त्या होत. याच्या मागे थोडा इतिहास आहे तो मनोरंजक आहे. साताऱ्याचें गजेंद्रगडकर घराणें व पुण्याचें भट घराणें यांमध्ये मोठी स्पर्धा असे. राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर यांच्या 'त्रिपथगे'ला भटांची 'विष्णुभट्टी' हें उत्तर होतें. कांही कारणाने गजेंद्रगडकरांच्या हातीं ही टीका लागली. त्यावर त्यांनी उपरोधात्मक 'दूषकरदोद्भेदिनी' (दात पाडणारी) टीका लिहिली. त्यावर भटांनी 'चिच्चंद्रिका' लिहून 'स्वांत' शब्दावर श्लेष करून गजेंद्रगडकर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'माध्व' मताचे असल्याने-खरमरीत उत्तर दिलें. पूर्वी पंडितांत अशा तऱ्हेची फार चुरस असे. भट्टोजी दीक्षितांच्या 'प्रौढ मनोरमे'वर जगन्नाथ पंडिताने 'मनोरमा-कुचमर्दिनी' टीका लिहिली हें प्रसिद्धच आहे! असो, अगदी अलीकडची-शेवटची म्हटलें तरी चालेल-अशी कै. म. म. वासुदेव शास्त्री अभ्यंकर यांची 'तत्त्वादर्श' ही अप्रकाशित टीका होय. तिचें प्रकाशन त्यांचे चिरंजीव म. म. प्रो. काशिनाथपंत सध्या करीत आहेत.

डॉ. किलहॉर्न हा 'भाष्यान्त' पंडित होता. त्याने जुन्या पद्धतीनें मुख्य मुख्य व्याकरणग्रंथांचें पांवत अध्ययन त्यावेळच्या शास्त्रीमंडळीजवळ 'समित्पाणि' होऊन दर्भासनाधिष्ठित असें केलें. परिभाषेंदुशेखरासारख्या कठीण ग्रंथाचें त्याने इंग्रजींत भाषांतर केलें आहे, हें मागे सांगितलेंच आहे. त्याने प्रस्तावनेंत म्हटलें आहे की डेक्कन कॉलेजच्या ग्रंथालयांत उपलब्ध असलेल्या टीका वाचल्यानंतरच स्वतःला भाषांतर करणें सुलभ झालें. आता ती आवृत्ति उपलब्ध नसल्याने भांडारकर रिसर्च इंस्टिट्यूटने पुनर्मुद्रणाचें काम हातीं घेतलें असून तें म. म. प्रो. अभ्यंकरांकडे सोपविलें आहे व त्याबरोबरच म. म. वासुदेव शास्त्र्यांची 'तत्त्वादर्श' टीकाहि प्रकाशित होत आहे.

परिभाषांचे प्रकार—परिभाषांवर केवढी ग्रंथसंपत्ति उपलब्ध आहे हें सांगितल्यानंतर त्यांच्या स्वरूपाविषयी थोडी अधिक चर्चा करणें इष्ट होईल. या परिभाषांचें कार्य काय हें मागे सांगितलेंच आहे. आता त्या कशा बनल्या हें पाहूं. परिभाषांचे चार प्रकार आहेत.

परिभाषांचे चार प्रकार आहेत.

(१) सूत्र वाचनिक-पाणिनीने सूत्ररूपानें सांगितलेल्या
(२) वार्तिककारांनी वार्तिकरूपाने पठन केलेल्या
(३) ज्ञापकसिद्ध (४) लौकिकन्यायसिद्ध (५) युक्तिसिद्ध

या ज्या परिभाषा आहेत त्या भूमितिशास्त्रांतील Axiom सारख्या पूर्णपणें स्वतःसिद्ध नाहीत; त्यांना अपवादहि आहेत म्हणजे त्या अनित्य आहेत. कांही भाष्यकारानें 'प्रत्याख्यात' केल्या आहेत. डॉ. किलहॉर्नच्या मते 'They are not universally valid.' तो पुढे म्हणतो—'The test of the universal validitiy of a परिभाषा is after all to the Hindu grammarian only this, whether or not its adoption in all cases in which it may be applicable would lead to the correct forms of the actual language, and a परिभाषा is accordingly considered valid so long as correct forms only result from its application and not valid as soon as its application would give rise to incorrect forms.' तात्पर्य जोंपावेतो ती परिभाषा इष्टरूपें साधण्यास उपयोगी पडत आहे तोंपावेतोच तिचें 'नित्यत्व' समजलें जाते; आणि जर का तसें होत नसेल तर तीच 'अनित्य' होते.

दुसरा मुद्दा असा की सूत्रें रचतांना पाणिनीच्या दृष्टिसमोर या होत्या की नाही हा विवाद्य प्रश्न आहे. तरीपण असें म्हणता येईल की यांपैकी पाणिनीने बऱ्याच परिभाषांचा कळत न कळत स्वीकार केलेला दिसतो. डॉ. किलहॉर्न म्हणतो—"By far the greatest number of the परिभाषाs and the most important of them must either consciously or unconciously have been adapted already by Panini".

ज्ञापकसिद्ध—आता 'ज्ञापकसिद्ध' परिभाषा म्हणजे काय तें पाहूं. पाणिनीने जीं सूत्रें रचिलीं त्यांतील कांही पदें किंवा समग्र सूत्र घेऊन त्यावरून ज्ञापित होणारीं-म्हणजे एका दृष्टीनें जीं पाणिनीला अवगत होतीं असें अनुमान काढतां येईल अशीं. 'रचांशे चारितार्थ्यम्, वचनसिद्धिः, फलमन्यस्यलेष्वपि' हें ज्ञापकाचें लक्षण आहे. एखादें पद परिभाषेचें तेव्हाच ज्ञापक होतें की जेव्हा ती परिभाषा नसल्यास तें सूत्र किंवा तें पद व्यर्थ ठरतें, पण ती परिभाषा मानल्यानेच ती 'चरितार्थ' म्हणजे आवश्यक ठरते. उदाहरणार्थ, पहिलीच परिभाषा घेऊं. ती अशी—'व्याख्यानतो विशेषप्रतिपत्तिर्न हि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संदेहाद्लक्षणम्' ही 'अइउण्' व 'लण्' या दोन माहेश्वर सूत्रांत णकार इत्संज्ञक असल्याने 'अण्' व 'इण्' हे प्रत्याहार साधतांना कोणचा णकार घ्यावा असा संदेह उत्पन्न होतो तेव्हा विशेष प्रतिपत्ति व्याख्यानतः करावी अशी परिभाषा तयार झाली. बऱ्याचशा परिभाषा 'ज्ञापकसिद्ध' असून त्या कोणत्या नां कोणत्या सूत्रांतील पदावरून सिद्ध झाल्या आहेत. कित्येक वेळां तीच परिभाषा अनेक ज्ञापकांवरूनहि सिद्ध होते.

लौकिकन्यायसिद्ध—लौकिक न्यायसिद्धांचें उदाहरण म्हणजे 'यदागमास्तद्गुणीभूतास्तद्ग्रहणेन गृह्यन्ते.' या परिभाषेचा अर्थ असा की ज्याला आगम होतो त्याचा तो अवयव होत असल्याने आगमरहित शब्दाच्या वाचक शब्दाने आगमसहित शब्दाचें ग्रहण होतें. ज्याप्रमाणे 'देवदत्तस्य अंगाधिक्ये-तद्विशिष्टस्यैव देवदत्तग्रहणम्'. जरी एखाद्याला अधिक बोटें असलीं तरी मनुष्य तोच असतो. म्हणजे धातूला 'आगम' चिकटला तरी त्याचें मूळ धातुस्वरूप बदलत नाही. किंवा याच्या उलट 'एकदेशविकृतमन्यवत्' ही परिभाषा घ्या—ज्याच्या एका भागांत कांही बदल झाला आहे त्यामुळे तो आपल्या पूर्वरूपाहून भिन्न होत नाही. 'यथा छिन्नपुच्छे शुनि श्वत्वव्यवहारः' शेपूट तुटलेल्या कुत्र्याला आपण कुत्राच समजतों. 'अभीयात्' इत्यादि रूपें सिद्ध करण्याकरिता लागूं पडत नसल्याने हिला अनित्य मानली आहे.

आणखी दोन एकमेकांविरुद्ध असलेल्या परिभाषा उलट सुलट लौकिकन्यायांनी सिद्ध होणाऱ्या आहेत. तेवढें दर्शवून मी पुरें करितों. "यस्य च लक्षणान्तरेण निमित्तं विहन्यते न तदनित्यम्" व "यस्य च लक्षणान्तरेण निमित्तं विहन्यते तदप्यनित्यम्" याला कैयटानें 'स्वमोर्नपुंसकात्' ७.१.२३ या सूत्रावरील भाष्याच्या टीकेंत वरील परस्परविरोधी परिभाषांच्या समर्थनार्थ दोन लौकिक दृष्टांताचीं उदाहरणें दिलीं आहेत. 'वालिसुग्रीवयोर्युध्यमानयोर्भगवता वालिनि हतेऽपि सुग्रीवस्य वालिनः प्राबल्यम् न व्यवहरन्ति। भगवत्साहाय्यैः पाण्डवैर्जये लब्धेऽपि पाण्डवानां प्राबल्यम् व्यवहरन्ति।' वाली व सुग्रीव यांचें युद्ध चालू असतां भगवान श्री रामचंद्राने वालीचा वध केला. तथापि सुग्रीव वालीपेक्षा जास्त प्रबल होता असें लोक मानीत नाहीत; परंतु भगवान श्रीकृष्णाच्या साहाय्यामुळे पांडवांना जय मिळाला असला तरी पांडव कौरवांपेक्षा प्रबल होते असेंच लोक मानतात. वरील दोन परिभाषांचा अर्थ—

(१) (दोन कार्यें युगपत् प्राप्त झालीं असतां) एखाद्या भिन्न सूत्राने ज्या कार्याचें निमित्त नष्ट होतें तें कार्य एवढ्यामुळेच अनित्य समजूं नये.

(२)..................... कोठे कोठे अनित्य मानतात. नित्यानित्यतेचें स्वरूप लक्षांत येण्यासाठी वरील दोन परिभाषा उद्धृत केल्या आहेत.

युक्तिसिद्ध—विस्तारभयास्तव युक्तिसिद्ध परिभाषा देत नाही. याप्रमाणें संस्कृत व्याकरणांतील सिद्धांतांचें योडक्यांत दिग्दर्शन केलें आहे.

(पुणें येथील भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या पंचेचाळिसाव्या वाढदिवशीं वाचलेला निबंध.)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्याची विश्वात्मकता

नी. र. वऱ्हाडपांडे

जबाबदारीने पार पाडायचा एखादा उद्योग हातांत नसला, दुसऱ्या एखाद्या कामांत मन रमत नसलें, व गप्पा मारायला निवडक स्नेही जवळ नसले म्हणजे मनाला एक प्रकारची शून्यता जाणवते. काळाचीं पावलें फारच रेंगाळत पुढे पडत आहेत असें वाटतें. अशा वेळीं मनाला विरंगुळा देणारें एक रामबाण औषध माझ्याजवळ आहे. तें म्हणजे कालिदास. मन कितीहि कंटाळलेलें असो, कालिदासाची अमृततुल्य वाणी जिभेवर खेळूं लागली की त्याला एकदम टवटवी येते. कालिदासाच्या शब्दांचें तालबद्ध नृत्य सुरू झालें की निरुत्साहाचें वातावरण पार विरून जातें. कालिदासाच्या कलासृष्टींत प्रवेश केल्याबरोबर जगांतील नीरसतेचा अजीबात विसर पडतो.

मेघदूत व ॲटम् बॉम्ब

माझें हें कालिदासाचें वेड पाहून माझ्या एका "पुरोगामी" मित्राला फार अचंबा वाटतो. जगाचें वाङ्मय एवढें "पुढे" गेलें असतांना हा माणूस दीड हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या वाङ्मयांतच अजून तन्मय होतो त्या अर्थी याचा मेंदू बुरसलेला व "प्रतिगामी" असला पाहिजे याबद्दल त्याची अगदी खात्री आहे. जुन्या काळचीं शस्त्रें अजबबंगल्यांत ठेवायला ठीक आहेत. आजच्या ॲटम् बॉम्बच्या काळांत कुणी परशुरामाचा परशु घेऊन लढायला उभा राहिला तर त्या परशूबरोबरच त्याची देखील अजबबंगल्यांतच रवानगी करावी लागेल. त्याचप्रमाणे कालिदासाचें वाङ्मय, त्याचा जन्म कुठें व केव्हां झाला, त्याच्या वेळची समाजस्थिति काय होती, वगैरे प्रश्नांचा अभ्यास करायासाठी वाचावें, पण केवळ वाङ्मयानंदासाठी नवकाव्य व नवसाहित्य सोडून "मेघदूत" वाचत बसणें यासारखा वेडेपणा कोणता ? असा माझ्या मित्राचा मला सवाल आहे.

'जुन्या शस्त्रांपेक्षा नवीन शस्त्रें जास्त कार्यक्षम, त्याचप्रमाणे जुन्या साहित्यापेक्षा नवें साहित्य जास्त उत्कृष्ट असा महासिद्धान्त वरील सवाल करणाऱ्यांनी गृहीत धरलेला असतो. पण एका साहित्यापेक्षा दुसरें साहित्य उत्कृष्ट आहे की नाही हें कसें ठरवायचें असें त्यांना विचारलें म्हणजे उडणारा त्यांच्या बुद्धीचा गोंधळ मात्र पाहण्यासारखा असतो. "कालिदासाने राजे व राण्या, यक्ष व यक्षिणी यांच्या प्रेमाचें वर्णन केलें म्हणून त्याचें साहित्य लोकाभिमुख नाही, आजचें साहित्य शेतांत राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या भावभावना चित्रित करतें म्हणून तें जास्त लोकाभिमुख आहे." अर्थात कालिदासाच्या साहित्यापेक्षा आजचें "साहित्य जास्त श्रेष्ठ आहे" असें कधी कधी प्रतिपादण्यांत येतें. राजाच्या जीवनाचें चित्रण न करतां शेतकऱ्याच्या जीवनाचें चित्रण केल्याने साहित्य जास्त लोकाभिमुख होतें असें क्षणभर गृहीत धरलें तरी लोकविमुख साहित्यापेक्षा लोकाभिमुख साहित्य श्रेष्ठ असतें असें मानायला आधार काय ? राजाचें चित्र काढणाऱ्या चित्रकारापेक्षा शेतकऱ्याचें चित्र काढणारा चित्रकार जास्त श्रेष्ठ दर्जाचा कलावंत असतो काय ? उर्वशीच्या चित्रांत श्रेष्ठ दर्जाची कला उतरूं शकत नाही, तेंच एखाद्या मजूर स्त्रीचें चित्र काढल्याबरोबर चित्रकलेचा उच्चांक गाठला जातो असें तत्त्व साहित्यशास्त्राच्या एखाद्या प्रयोगशाळेंत सिद्ध झालेलें आहे की काय ? राजाच्या जीवनाचें चित्रण करणाऱ्या दोन काव्यांमध्ये एक अत्युत्कृष्ट व अति भिकार असूं शकतें, त्याचप्रमाणें शेतकऱ्याच्या जीवनाचें चित्रण करणारी एखादी कादंबरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अव्वल दर्जाची व दुसरी दशम दर्जाची असूं शकते. एखादें साहित्य लोकाभिमुख आहे असें सांगितल्यानें तें पहिल्या दर्जाचें आहे की दहाव्या दर्जाचें आहे याबद्दल कांहीच बोध होत नाही.

लोकाभिमुखता व बहुसंख्या

शिवाय लोकाभिमुखता म्हणजे तरी काय ? ज्या साहित्यांत बहुसंख्य लोकांच्या जीवनाचें चित्रण असतें तें साहित्य लोकाभिमुख अशी व्याख्या केल्यानें निभाव लागत नाही. युरोपांतील कांही देशांमध्ये सात स्त्रियांस एक पुरुष असें प्रमाण आहे म्हणतात. या देशांमध्ये जें साहित्य स्त्रीजीवनाचें चित्रण करीत नाही तें साहित्य लोकाभिमुख नसतें असें म्हटलें पाहिजे. इंग्लंडमध्ये तरुणांपेक्षा म्हाताऱ्यांचें प्रमाण जास्त आहे असें म्हणतात. अर्थात ज्या ज्या इंग्रजी कादंबऱ्यांमध्ये नायक तरुण दाखवलेले असतील त्या सर्व इंग्रजी कादंबऱ्या लोकविमुख व म्हणून भिकार ठरवल्या पाहिजेत. हिंदुस्थानांत कारखान्यांत मजुरी करणाऱ्यांचें प्रमाण बाकीचे व्यवसाय करणाऱ्यांच्या मानानें बरेंच कमी आहे, तेव्हा मजुरांच्या जीवनाचें चित्रण करणाऱ्या सर्व "पुरोगामी" कादंबऱ्या "लोकविमुख" व वस्तुतः पाहतां प्रतिगामी ठरवल्या पाहिजेत. सर्व जगांत चिनी लोकांची संख्या जास्त असल्यामुळे विश्वसाहित्याच्या दृष्टीनें चिनी माणसाला नायक कल्पिणारें साहित्य लोकाभिमुख व अत्यंत अल्प संख्येंत असणाऱ्या ज्यू धर्माच्या व्यक्तीला नायक कल्पिणारें साहित्य लोकविमुख, असे जाडे सिद्धांत गृहीत धरावे लागतील.

साहित्य लोकाभिमुख आहे की नाही हें त्यांत कशाचें चित्रण केलेलें आहे यावरून ठरत नाही. लेखकानें कोणताहि विषय निवडलेला असो, त्याच्या लेखनांत जास्तींत जास्त वाचक समरस होऊं शकतात की नाही यावरून तें कितपत लोकाभिमुख आहे हें ठरेल. वूडहाउसच्या कादंबऱ्यांमध्ये गर्भश्रीमंत असे वडेवडे लाट व लक्षाधीश व्यापारी यांची रेलचेल आहे. पण इंग्लंडमध्ये कोळशाच्या खाणींत काम करणारा मजूर देखील वूडहाउसच्या कादंबऱ्या वाचून खदखदा हसूं शकतो. उलट खाणींतल्या मजुराचें जीवन रंगविणारी एखादी कादंबरी दुय्यम दर्जाच्या लेखकानें लिहिली असेल तर तीन चार पानें वाचून तो ती बाजूला ठेवून देईल. वूडहाउसच्या कादंबऱ्यांतलें जीवन सर्वस्वी काल्पनिक व अवास्तव आहे. त्याच्या गोष्टींतल्या प्रत्येक पात्राच्या डोक्याचा स्क्रू ढिला असतो. असलीं पात्रें व्यवहारांत बहुसंख्येनें काय पण एकटदुकट देखील सापडणें कठिण आहे. असें असून देखील वूडहाउस ज्याला ज्याला इंग्रजी भाषा समजते त्याच्या मनाची पकड घेतल्याशिवाय राहत नाही. लक्षावधि लोक ज्या साहित्याचा मनसोक्त आस्वाद घेऊं शकतात तें साहित्य कितीहि अवास्तव असलें तरी त्याला लोकविमुख म्हणतां येत नाही; व बहुसंख्य लोकांच्या जीवनाचें कितीहि वास्तव चित्रण करणारें साहित्य असो, तें जर बहुसंख्य लोकांना वाचवत नसेल तर त्याला लोकाभिमुख म्हणणें ही त्या शब्दाची चेष्टा होईल. लोकाभिमुखतेच्या या कसोटीस कालिदासाचें साहित्य पुरेपूर उतरेल यांत मला मुळीच शंका नाही. आज संस्कृत भाषा फारशी प्रचारांत नसल्यामुळे याबद्दल खात्री पटवणें कठिण झालें आहे, पण ज्याला संस्कृत भाषा समजते असा वाचक कुठल्याहि देशांतला असो, त्याचा आर्थिक दर्जा कांहीहि असो व तो कोणत्याहि संस्कृतींत वाढलेला असो, कालिदासाची मोहिनी त्याच्यावर पडल्याशिवाय राहणार नाही, हें अनेकवार सिद्ध झालेलें आहे.

अनाघ्रात पुष्प व रमणीय वनश्री

कालिदासाचें वाङ्मय निर्माण झाल्यानंतर हजारो वर्षें लोटून गेलीं. या हजारो वर्षांच्या काळामध्यें समाजस्थितीमध्ये कितीतरी बदल झाला आहे. समाजस्थितींत बदल झाला म्हणजे माणसाच्या भावना, विचार व अभिरुचि देखील बदलतात. असें असतांना कालिदासाचें वाङ्मय आजहि ताजें व जिवंत वाटतें याचें कांही लोकांना आश्चर्य वाटतें. कालिदासाच्या वाङ्मयाबद्दल अज्ञान हेंच बहुधा या आश्चर्याचें कारण असतें. आज कण्वाच्या आश्रमासारखे आश्रम जाऊन त्यांची जागा शाळाकॉलेजांनी घेतली आहे. शकुन्तलेसारख्या वल्कलें नेसणाऱ्या आश्रमवासिनी जाऊन

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांची जागा तलम पातळें नेसणाऱ्या नवयुवतींनी घेतली आहे. असें असलें तरी कण्वाच्या आश्रमांत जी वनशोभा व उपवनशोभा होती ती आज आपल्याला नकोशी झालेली आहे असें नाही. तिची मोहिनी आजहि कायम आहे. अनाघ्रात पुष्पासारख्या नाजुक व सुंदर स्त्रीकडे पाहून दुष्यंतासारखे राजेच आकृष्ट होतील असें नाही. आजचा एखादा पुरोगामी देखील तिच्याकडे पाहून वेडा होईल. प्रिय कन्येला कायमचें दूर करतांना जुन्यापुराण्या कण्वाचेंच मन व्याकुळ होणें शक्य आहे, आजच्या पित्याचें मन "कन्या सासुराशी" जातांना मुळीच विचलित होत नाही, असें आंतला कांही भाग नाही. कालिदासाच्या वेळची समाजस्थिति आजच्यापेक्षा कितीहि वेगळी असली तरी वनश्रीची आवड, शृंगार व वात्सल्य या भावना आजहि कायम आहेत. या भावना जोंपर्यंत कायम आहेत तोंपर्यंत कालिदासाच्या वाङ्मयाचें सामर्थ्य कमी होणें शक्य नाही.

शिवाय अनेक वेळां भावनांचे विषय बदलले तरी त्यांची परिणामकारकता कमी होत नाही, असा अनुभव आहे. गंगानदी ही देवता आहे व गंगेंत स्नान केल्यानें पापक्षालन होतें ही भावना आज अनेक सुशिक्षितांच्या ठायीं नाही; पण तरी जगन्नाथाच्या गंगालहरीची परिणामकारकता आजहि कमी झालेली नाही. एखाद्या वाचकाच्या मनांत गंगेबद्दल पावित्र्याची भावना नसेल, पण दुसऱ्या कशाबद्दल तरी त्याच्या मनांत पावित्र्याची भावना असते. जगांत असें एखादें तत्त्व वा व्यक्ति असते की जिच्या विचारानें व सहवासानें आपलें मालिन्य नाहीसें झाल्याचा त्याला अनुभव येतो. कशाहि बद्दल का असेना त्याच्या मनांत ही पावित्र्याची भावना जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत गंगालहरीचा परिणाम त्याच्या मनावर झाल्याशिवाय राहणार नाही. ज्याचें स्वतःच्या मुलावर प्रेम आहे तो दुसऱ्यांच्या अपत्यप्रेमाशीं समरस होऊं शकतो. त्याचप्रमाणे ज्याला पावित्र्यभावनेचा अनुभव आहे त्याची गंगेवर श्रद्धा नसली तरी जगन्नाथाच्या गंगेसंबंधीच्या भावनांशीं तो समरस होऊं शकतो. पावित्र्यभावनेचा विषय कोणता आहे यावर स्तोत्रकाव्याचा परिणाम अवलंबून नाही; पावित्र्यभावना निर्माण करण्याचें कवीचें कौशल्य कोणत्या दर्जाचें आहे यावर तो अवलंबून आहे.

नवीं विटी, जुनें राज्य

समाजस्थिति बदलल्यामुळे भावनांचे विषय बदलतात; पण भावनाच मुळांत नाहीशा होतात याला इतिहासांत आधार नाही. मध्ययुगामध्ये एका धर्माच्या लोकांमध्ये, एकतेची भावना होती, आपल्या धर्माचा ग्रंथ व त्याचे मानबिंदु यांच्याबद्दल पूज्यतेची भावना होती, त्यांचा मान राखण्यासाठी लोक मरायला तयार होते. पुढे धर्मासंबंधींच्या भावना इतक्या प्रबळ राहिल्या नाहीत. पण राष्ट्रवादाचा उदय होऊन ज्या भावना धर्मामुळे उत्स्फूर्त होत होत्या त्याच राष्ट्रकल्पनेमुळें उत्स्फूर्त होऊं लागल्या. धर्मग्रंथ व धर्माचीं इतर प्रतीकें याचप्रमाणे राष्ट्राचें निशाण व राष्ट्राभिमानाचीं केंद्रस्थानें हेच लोकांचे मानबिंदु झाले व त्यांच्यासाठी प्राण देणें हा उदात्ततेचा आदर्श समजला जाऊं लागला. ज्या जमातीमध्ये एका स्त्रीने अनेक पति करण्याची चाल असते तिथे बायकोवर संशय आल्याबरोबर ऑथेल्लोच्या मनांत जें मत्सरयुक्त द्वेषाचें कल्लोळ उठलें, तसें एखाद्या पुरुषाच्या मनांत उठण्याचा फारसा संभव नाही. तरी अशा समाजांत मत्सरयुक्त द्वेष ही भावनाच अस्तित्वांत नसते असें नाही. या भावनेचा विषय बायको हा नसतो एवढेंच. बहुपतिक समाजामध्ये राहून आलेले प्रवासी असें सांगतात की या समाजांत आपली बायको दुसऱ्याबरोबर गेली तर ज्या पुरुषाला कांहीच वाटत नाही तोच, कुणी त्याच्या हातांतल्या बटव्याला हात लावला तर त्याच्या नरडीचा घोट घ्यायला धावतो. ट्रोब्रिया नांवाच्या बेटामध्ये विवाहसंस्थाच नसल्यामुळे पुरुषाला मुलें होतात हेंच तिथल्या रहिवाशांना माहीत नाही. या समाजांत साहजिकच पितृनिष्ठा व पितृप्रेम अस्तित्वांत राहण्याचा संभव नाही. पण त्या लोकांमध्यें प्रेम व निष्ठा या भावनाच नाहीत असें नाही. मुलांचें पालनपोषण करण्याची जबाबदारी मामाची समजली जात असल्यामुळे इतर समाजांत पित्याविषयीं वाटणाऱ्या भावना या समाजांत मामाविषयीं वाटतात; म्हणजे या भावनांचा विषय वेगळा असतो एवढेंच.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रवण आणि ऑथेल्लो

बदलत्या समाजस्थितीबरोबर याप्रमाणे भावनांचे विषय बदलले तरी मूळ भावना जोंपर्यंत कायम आहेत तोंपर्यंत त्या भावनांना आवाहन करणाऱ्या वाङ्मयाचें सामर्थ्य नाहीसें होत नाही. ट्रॅम्रिया वेटां-तला माणूस देखील आपल्या आंधळ्या आईबापांची निष्ठेने सेवा करणाऱ्या श्रवणाची कथा ऐकून सद्‍गदित होऊं शकेल; मात्र या कथेशीं समरस होतांना पित्याच्या जागीं कदाचित् त्याला मामाची कल्पना करावी लागेल. धर्मावर श्रद्धा नसणाऱ्यांनादेखील धर्मासाठी प्राणाचें बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांचें चरित्र वाचतांना गहिंवर येऊं शकतो; कारण धर्मावर श्रद्धा नसली तरी प्राणापेक्षाहि ज्यांचें मोल त्यांना मोठें वाटतें अशा इतर कांही निष्ठा त्यांच्या ठायीं असतात. बहुपतिक समाजांत देखील ऑथेल्लो नाटक परिणामकारक होणारच नाही असें म्हणतां येणार नाही. ऑथेल्लोच्या भावना समजून घ्यायला बहुपतिक समाजांतील प्रेक्षकांना ज्या ज्या बाबतींत मत्सरयुक्त द्वेष वाटूं शकतो त्या बाबी व डेस्डिमोनाचें पातिव्रत्य यांच्यांतील सादृश्याची जाणीव ठेवावी लागेल. अशी जाणीव त्यांच्यांत निर्माण होऊं शकेल की नाही हें दुसऱ्याच्या भावना समजण्यास लागणारी सहृदयता व आत्मौपम्यबुद्धि त्यांच्यांत कितपत आहे यावर, त्याच-प्रमाणें लेखकाच्या भावनानिर्मितीच्या सामर्थ्यावर देखील अवलंबून राहील. नास्तिकाला देखील भक्तीचा पाझर फोडणारें तें खरें भक्तिकाव्य, दगडासारख्या निष्करुण पुरुषालाहि जो रडायला लावील तो खरा करुणरस, त्याचप्रमाणे कामविषयक मत्सर ही भावना ज्या प्रेक्षकाच्या मनांत नाही त्याला देखील जर ऑथेल्लो नाटक हलवून सोडील तरच तें खरें विश्वसाहित्य ठरेल. नाही तर एखाद्या विशिष्ट समाजस्थितींत राहणाऱ्या लोकांचें तें साहित्य आहे, सर्व काळाचें व सर्व देशांचें तें साहित्य नाही असें म्हणावें लागेल.

विश्वात्मकतेच्या मर्यादा

आतापर्यंतच्या विवेचनावरून साहित्याच्या विश्वात्मकतेला कांही मर्यादा नाही असें मला सुचवा-यचें नाही. मानवी भावनांचे विषय बदलले तरी मूळ भावना बदलत नाहीत हें स्थूलमानानेच खरें आहे. पण विषय बदलल्यामुळे देखील भावना व्यक्त कर-ण्याच्या पद्धतींत व भावनेच्या स्वरूपांत फरक पडतो. अपत्यप्रेम व स्त्रीप्रेम या दोन्ही प्रेमाच्याच भावना असल्या तरी त्यांच्या अभिव्यक्तीमध्ये बराच फरक असतो. एखाद्या शृंगारिक कवितेमध्ये बालकाच्या जागीं स्त्रीची कल्पना केली की लगेच वात्सल्याचें रूपांतर शृंगारांत होऊं शकणार नाही. "तुझ्या दंतहीन मुखां-तून निघणारे बोबडे बोल ऐकून माझं मन हरपतं" असें एखाद्या बालकाला उद्देशून न म्हणतां कुणी आपल्या प्रियतमेला म्हणूं लागला तर लवकरच त्याचें स्वतःचें तोंड दंतहीन झाल्याशिवाय राहणार नाही. भावनांचे विषय बदलल्यामुळे भावनांच्या स्वरूपांत जर फार मोठा फरक झाला तर त्या भावनेला आवाहन करणारें साहित्य कालांतराने निष्प्रभ होईल. बीन खाणें महापातक आहे असें पिथॅगोरसच्या धर्माचें तत्त्व होतें. या तत्त्वावर श्रद्धा असणाऱ्या पिथॅगोरसच्या काळच्या एखाद्या कवीने "प्राण गेला तरी बीन खाणार नाही." अशा निर्धाराने बलिदान करणाऱ्या एखाद्या हुतात्म्याचें कितीहि करुणरसपूर्ण चित्र रंगविलें असलें तरी आज त्यामुळें करुणरसाऐवजीं हास्यरस निर्माण होण्याचाच संभव अधिक आहे. पिथॅगोरसला बीनबद्दल वाटणारी घृणा आज आपल्याला इतर कांही पदार्थांबद्दल वाटते. म्हणजे ही भावना नष्ट झाली नसून केवळ तिचा विषय बदलला आहे. असें असून देखील पिथॅगोरसच्या बीनसंबंधींच्या भावनांशीं आज कुणी समरस होऊं शकणार नाही. नरबली दिल्याने पीक चांगलें निघतें अशी पूर्वी समजूत होती. त्याकाळीं नरबली देणाऱ्यांना आपण एक सामाजिक कर्तव्य करीत आहोंत असें वाटत असेल. त्याचप्रमाणे बळी जाणाऱ्याला देखील आपण समाजहितासाठी बलिदान करीत आहोंत अशा भावनेने धन्यता वाटण्याचा संभव होता. त्या काळच्या एखाद्या कवीनें नरबलीच्या प्रसंगावर बळी देणाऱ्यांच्या कर्तव्यबुद्धीचें व बळी जाणाऱ्याच्या धन्यतेचें चित्रण करणारें कितीहि कलात्मक असें काव्य लिहिलें असलें तरी आज तें वाचून आपल्या मनांत या भावना उत्पन्न

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होण्याचा संभव नाही. समाजहितासाठी स्वतःचें वा स्वकीयांचें बलिदान देण्यांत वाटणारी धन्यतेची भावना आजहि नष्ट झालेली नाही. पण असें असूनहि नरबली दिल्यानें जमीन सुपीक होते या कल्पनेच्या साहचर्यानें त्या भावनेचें आवाहन आज होऊं शकत नाही. भावना कायम असल्या तरी समाजस्थितींत व लोकांच्या समजुतींमध्यें फरक पडल्याने. कांही विषयांचें त्या भावना चेतविण्याचें सामर्थ्य नाहीसें होतें.

हें वाङ्मय अमर आहे

साहित्याच्या विश्वात्मकतेला सामाजिक परिवर्तनामुळें अशा अनेक मर्यादा पडतात. पण अगदी जुन्यांतल्या जुन्या अशा वेदवाङ्मयाची देखील परिणामकारकता नाहीशी होण्याइतका आज समाज बदललेला आहे असें मला वाटत नाही. एकतर प्राचीन वाङ्मय वाचतांना तें प्राचीन आहे हें लक्षांत ठेऊनच आपण तें वाचीत असतों, ज्या काळांतलें वाङ्मय आपण वाचतों त्या काळाच्या चष्म्यांतून त्याच्याकडे पाहण्याची आपली क्षमता जितकी जास्त असेल

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र
प्रतिष्ठान
दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य
आजच वर्गणीदार व्हा
वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणे आहे. लिहा.
"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

तितकाच त्याचा आपल्या मनावर जास्त परिणाम होईल. दुसरें असें की उषा, पर्जन्य वगैरे नैसर्गिक घटना या देवता आहेत ही समजूत आज अनेकांच्या ठायीं नसली, तरी देवतांबद्दल वैदिक ऋषींना वाटणारें विस्मययुक्त आकर्षण अजूनहि आपल्याला उषा व पर्जन्य यांच्याबद्दल वाटतें. नासदीय सूक्त रचणाऱ्या ऋषीनें विश्वाच्या उत्पत्तीबद्दल मारलेल्या कल्पनेच्या भराऱ्या आजहि कौतुकास्पद वाटतात. वैदिक भाषेचे उच्चार व स्वराघात आजहि आपण विसरलों नसल्यामुळे वैदिक ऋचांची कर्णमधुरता आजहि कायम आहे.

जुन्यांतल्या जुन्या अशा वेदवाङ्मयाचें सामर्थ्य जर अजून कायम आहे तर कालिदासाच्या वाङ्मयाबद्दल बोलायलाच नको. त्याच्या वाङ्मयांत प्राधान्यानें दिसणारी शृंगारभावना आजहि कायम आहे. पराक्रम, निष्ठा व सौंदर्य यांचे कालिदासानें रंगविलेले आदर्श आजहि जनमनांमध्ये अढळ आहेत. ज्याला पाहतांच मोठमोठे क्षत्रिय चळचळा कापत होते त्या परशुरामाचें लीलेनें गर्व हरण करणारा अल्पवयी राम व आपल्या निष्पाप वहिणीच्या चारित्र्यावर शितोडे उडवणाऱ्या दुष्यन्तासारख्या सम्राटाला "ऐश्वर्यमत्त" म्हणून बजावणारा बटु यांच्या व्यक्तित्वाचें प्रभावशालित्व आजहि लोपलेलें नाही. गाईचें रक्षण करण्यासाठी स्वतःचा प्राण द्यावा की जिचें रक्षण करण्याचें व्रत धारण केलें तिला आपल्या डोळ्यादेखत खुशाल मरूं द्यावें हें दिलीप व सिंह यांच्या रूपानें कालिदासानें उभें केलेलें नैतिक द्वंद्व आजहि उद्‌बोधक आहे. आधुनिक वाङ्मयापेक्षा देखील जो आज जास्त जिवंत वाटत नाहीं असा कालिदासाच्या वाङ्मयांत एकहि भाग मला आढळत नाही. कालिदासाची अवतार-समाप्ति होऊन आज सुमारें दीड हजार वर्षें झालीं. दीड हजार वर्षांनंतरच्या वाचकाला देखील जिवंत वाटेल असा आजच्या लोकाभिमुख वाङ्मयांत किती भाग आहे ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

काळु घराण्यांतील कागदपत्र

शंकर गोविंद चट्टे

(आपासाहेवाचा अहवाल)

(मागील अंकावरून चालू)

या सवालाचा जवाव साहेव मजकुरांनी एंसा पाठविला की जे पक्षी तुम्हास दोस्ती सरकारकुंपनीची हतून निहायत मंजूर आहे ते पक्षी आपण सडे आम्हाजवळी येऊन भेट घ्यावी व साडेसात लाख रुपये मुकरर केले आहेत त्या ऐवजी मुलुख तोडून द्यावा. जेव्हा साहेव मजकुराकडोन कोणी वेळेस शिवाय खिलाफ मोईन दुसरे काम नजरेस आलेच नाही तेव्हा जवाव सांगोन पाठविला की तुमचे वोलण्यावर ऐतिबार राहिला नाही. सडे भेट कैसी घ्यावी. ते वेळेस सरकार कंपनीचे तर्फेनी व आपले तर्फेनी काळचाराण्याची शपथ पाहिजे तशी लिहून पाठविली जे हरसुरतीनी सरकारकुंपनीची दोस्ती पहिलेपेक्षा अधिकोत्तर कायम जाणोन कोणतेहि रीति अंदेशा दिलांत न आणोन आपण एकले यावे. आम्ही कोलकसम सरकारचा मुस्तहलाल जागोन जी कसमकैफियत नवाव सुजाएतद्दोला वहादूर याचे लढाईचे प्रसंगी जाहिरित आली होती कीं जेव्हा नवावमवसुफ शिकस्त झाल्यानंतर तनजहांतून सरकार मकसुहसी भेटले व सरकार मवसुफांनी कमाल इज्जत व हुरमतीचे साथ त्यासी सलुख केला तोहि खियालात आणला. व दुसरे ऐसा कसूर की जो अदावतीस सवव होय. आपले कडोन मुलाहिजा न केला म्हणोन वेदगदगा साहेव मजकुराजवळ गेलो जे वेळेस सीतावर्डीचे हद्देत पोहचलो वमोजिव साहेव मजकूर इस्तकवाल येऊन आपले वंगल्यावर घेऊन गेले. ते वेळेस साहेव मजकुराशी वोलली की पहिलपासोन आम्ही सरकारकंपनीचे दोस्तीपरता दुसरी गोष्ट आपले चित्तात कायम ठेवले नाही व हन्नोज ठेवीत नसता वारहा तुम्हाकडोन वरआकस ऐन दोस्तीचा हयल नमूद होतात. आम्ही शमपोसी करुन मोहवतीचा रिस्ता सोडीत नाही या मुकद्दम्यात अव्वल शुरवात जंगोफिसादीचा तुम्हाकडोन आला लाचार. आम्हीहि सिद्ध जालो वरे·········व मोहवतीच्या आइनात जे वेळेस जिक(डू)न···(क)सूर जाला. पुन्हा माफ करणे ज्यायद ठेविले आहे. कवूल आहे कीं·········कसूर जाला. आम्हाकडोनच जाला परंतु सरकारकंपनी मोठे ज्यायज जव आम्हा लोकाची आहेत तक्षिरात आमची माफ करावी. जर आपणास मुलुक घेणे व आम्हा मारणेच मंजूर असल्यास हजर आहो, ऐसे वोलून समशेर व मोहोर आपली साहेवाचे रोवरो ठेवली. त्यांनी या दोन्ही चिजा उचलून आमचे हवाले केले व जाहीर केले की हजार हजार तोवा आहे की हा खयाला पसंद आमचा विल्कूल नाही खातरजमा आपली ठेवावी. ऐसी वहुतशी खातरजमा आमची केली. तेव्हा जर्नेलसाहेव मजकूर फौजसुद्धा लढाईस कमरवंद होऊन आमचे लष्करचे मुकावल्यास तमाम सव उभे राहिले व आमचेहि फौजवंद दस्तुर तयार होती. जंकिनसाहेवी अर्ज केला की कमरवंदी खोलोन आपले ज्याय मुक्कामी जाऊन आराम करेत व तोफखाना जर्नेल साहेवाचे हवाला करोन घ्यावा. तेव्हा सरकार कंपनीचे दोस्तीचा पास······रामचंद्र वाघ मुसाहेव कारमुखत्यार कूल होता त्याजला पाठवोन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खुषखबर सल्हेची तमाम लष्करांत पोहचवून कमरा खोलविल्या. लष्करवाले खातरजमेनी जाबजा······ गेले. जे निजले वा जे जागे राहिले तितक्यांत फौज जर्नेल साहेवाची······त्याहा···येऊन कत्तल करणें व तोफ मारणे सुरु केले. इकडील······वास व दगावाजीस वाकिफ नव्हते. बलके सलेच्या भरोशा(वर) आपला ······कारभारांतच मशगुल राहिले ते समगरदान होऊन हनिमत पावले. व आम्हास तेच वेळेस कद केलें. यानंतर शहरास महासरा केला सवब माठनवशे कोम आरव शहरांत होते ते लहडण्यास मुस्तेद होऊन शहरची निगाहदास्त करूं लागले. चौतरफ जर्नेल दपरीन साहेव व कर्नेल इस्काटसाहेब वगैरे मोर्चा बांधोन रात्रंदिवस लढाई करोन हमलेकरणी सुरूं केली. चवदा-रोजपर्यंत हरयेक तऱ्हेचा इरादा बजावून आणिला. परंतु त्या लोकापासोन शहर हस्तगत करणे मुष्कील पडले. आखर जेव्हा तमाम हल्ल्यापासोन वाज राहिले तेव्हा आम्हांस सांगितलें कीं, तुमच्या खातरीकरिता मुलकाचा बंदोबस्त करोन तुमचे येकत्यार करोन देऊ आपण कांही अंदेशा चित्तांत न आणावा. हुकूम द्यावा. अरव शहरावाहेर जाओन राहेत. वावजूद त्याची तनखा अरबाची देऊन खारिज करविले जेवेळेस शहर आरवापासोन खालीं जाले. साहेबांनी चौकी पहारे आपले हरएक जागी कायम करोन हुकूम आपला जारी केला. व इकडे आमशी बोलले की रुपयाचे ऐवजी मुलुक तोडोन द्यावा व तुम्ही आपले मसनदशीन व्हावे. आम्ही हरचंद रदवदली केली कीं आतापावेतो सरकार कंपनीचे तर्फेनी कौलकरार लिहि··जाण्याचे वरखिलाप अमलांत आणिले आता तरी तहनाम्यावमोजिब अमल करावा. हरगिज आमचे बोलणे खियालांत न आणोन ज्यादा जिदबाजी फर्माऊ लागले तेव्हा (वि)चाराशिवाय ······करण्याचा न दिसला. तेव्हा लाचार. मुलुक देणे कबु(ल) (करो)न सुभा जवलपूरचा तीस लाख रुपयाचा होता तो दो लाख रुपयाचा ठहरविला व सुभा श्रीनगर हुशंगाबाद व रेवातीर सात लक्षाचा दोन लाख रुपयाचा आकार केला व सुभा गढा मंडला जमात···तो पन्नास हजारात व सुभा शिवनीछपारा तीन लाख रुपयाचा एक लाखावर मुकरर केला व चार महाल दुसरे आकोट आडगाव बडनेर गंगाई व भातकोली गाव्हेलचे पोटांतील महाल महासील त्याचा जर्नेल वलजलीसाहेब बहाद्दुरांनी चार लाख रुपये........ मय किल्ला आमचे चुलत्यास वापस दिले होते तेहि पन्नास हजारा-वर कलमवंदीत आपले व सुभा समलपूर की जेथे हिऱ्याची खाण आहे व मालियात त्याची मैकान दोन लाख रुपयाची असता तेहि एक लाख रुपयावर ठहर-विली व सुभा सरगुजा एक लाख रुपयाचा पन्नास हजारावर तहरीरींत आणिला. याप्रमाणे आपले दिला वमोजिव साहेव मजकुरांनी आम्हापासोन जवरदस्तीने लिहिणे करोन घेतले. याशिवाय किल्ला भिवरागड की त्या किल्ल्याचे पोटात चाळीस हजाराची घडणूक आहे व किल्ला एकोणतीस हजाराची ज्यायदाद व सोहागपूर पंधरा हजार रुपये एकुण शिवाय हिशोबांत मुंकरर झाले. वोलले जे पक्षीं सिवाय........ जे नसफी व टुटीच्या नजरेस न आले. लाचार. तेहि लिहून दिले. याखेरिज एक लाख रुपये किमत...... अडचिशे याची—

(यापुढील मजकूर लिहिलेला नाही)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुपार

वाटचालीने थकला
नभांतील सूर्यंकर
आणि दुपारची उन्हं
तोंच आली माथ्यावर !

स्तब्ध जाहलेच सारे
हळूं सावल्या पेंगती
निळे गोल कवडसे
झरोक्यांतूनच येती !

सारीं माणसें झोपेनें
झाली माडवी सोप्यांत
दाणे चिमण्या येऊनी
अंगणांत टिपतात !

सुखें कुणी पहुडती
शांत आम्रवृक्षातळी
हळूं जलपृष्ठावर
एक झळके मासळी !

जमतात निंबाखालीं
गुरें वासरें छायेंत
आणि फांदिवर खार
गुंगलेली डुलक्यांत !

सुस्त उन्हानें [illegible]
नदी [illegible] जरी
वैशा[illegible]तील तें उन
वाढवितें शिरशिरी !

चिट पाखरूं एखादे
फिरकेना अंतराळीं
स्नानासाठीं उतरते
कुणी मत्स्यगंधा जळीं !

—कृष्णचन्द्र भोईटे

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघाने यावर्षी हळबी, कोरकू व गोंडी यांपैकी एका बोलीच्या संशोधनाला उत्तेजन व आर्थिक सहाय्य देण्याचें योजिलें आहे. हें काम करूं इच्छिणारे संशोधक मराठी विषय घेऊन एम्. ए. परीक्षेंत पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालेले व भाषिक संशोधनाची विशेष आवड असलेले असावेत. या संशोधन-कार्यासाठी लागणारें अवश्य तें आर्थिक साहाय्य त्याला वि. सा. संघाकडून करण्यांत येईल. संशोधकास पीएच्. डी. करिता त्या विषयावर प्रबंध लिहिणें असल्यास त्यास वि. सा. संघाची हरकत राहणार नाही.

हें काम करूं इच्छिणाऱ्या अभ्यासकांनी १० सप्टेंबर १९६९ पर्यंत सरचिटणीस, वि. सा. संघ, यांचेकडे अर्ज पाठवावेत.

अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

केंद्रवृत्त नागपूर,

ल. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

सांस्कृतिक कार्यक्रम

दि. १ ऑगस्ट १९५९ रोजीं सायं० ६–३० वाजता कै. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथिनिमित्त संघाध्यक्ष श्रीमान खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. त्याप्रसंगीं प्रमुख वक्ते, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु आणि मध्यप्रदेश विधानसभेचे सभापति पं. कुंजीलाल दुबे यांनी लोकमान्यांच्या प्रतिमेला श्रद्धांजलीपूर्वक पुष्पहार समर्पित केला; आणि कै. टिळकांच्या राजकीय आणि सांस्कृतिक कार्यासंबंधी भाषण केलें. तसेंच प्रा. पां. कृ. सावळापूरकर आणि प्रा. र. वि. रानडे यांचींहि भाषणें झालीं.

मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री, पं. रविशंकर शुक्ल यांचा वाढदिवस

दि. २ ऑगस्ट १९५९ रोजीं विदर्भ साहित्य संघाने, मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्या ७९ व्या वाढदिवसानिमित्त एक छोटासा सत्कार समारंभ सकाळीं ८॥ वाजतां घडवून आणला. या प्रसंगीं मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. बी. पट्टाभि सीतारामय्या यांच्या समवेत प्रदेशाचे उद्योगमंत्री श्री. मेहता, अर्थमंत्री श्री. बियाणी, शिक्षणमंत्री श्री. मंडलोई, बहुतेक उपमंत्री, नागपूरचे महापौर बॅ. वानखेडे, आकाशवाणीचे स्टेशन डायरेक्टर श्री. नटराजन्, विदर्भ साहित्य संघाचे दाते, पूर्वाध्यक्ष, विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाचे सभासद उपस्थित होते.

प्रथम संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांनी मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांना पुष्पमाळा समर्पित करून त्यांचें स्वागत केलें, आणि मुख्यमंत्र्यांच्या कारकीर्दींत राज्यांतील विविध क्षेत्रांत झालेल्या प्रगतीचें सिंहावलोकन केलें.

त्यानंतर उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी मुख्यमंत्र्यांच्या गौरवपर छोटेसें भाषण केलें.

माननीय मुख्यमंत्र्यांनी सत्कारास उत्तर देतांना लोकसेवेंतच आयुष्य वेचीन असे उद्गार काढले.

शेवटीं चिटणीस सौ. इंदुमति शेवडे यांनी आभार मानले. पानसुपारीनंतर हा सुटसुटीत कार्यक्रम आटोपला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. डॉ. रा. शं वाळिंबे यांचीं व्याख्यानें

दिनांक १३ आणि १४ ऑगष्ट १९५९ रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां सुप्रसिद्ध टीकाकार, प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे, पुणें, यांनी "प्राचीन भारतीयांची नाटयदृष्टि" या विषयावर दोन अभ्यासपूर्ण व्याख्यानें दिलीं. या कार्यक्रमांचे अध्यक्ष, संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे हे होते.

वेदाचार्य पं. श्री. दा. सातवळेकर यांची भेट

दि. २२ ऑगस्ट १९५९ रोजीं सायं. ६ वाजतां विदर्भ साहित्य संघाला वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध वेदाचार्य पं. श्री. दा. सातवळेकर यांनी भेट दिली वेदाचार्यांना सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री रा. पु. सगदेव यांनी पुष्पहार घालून त्यांचा परिचय करून दिल्यावर या प्रसंगी संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांनी त्यांचा गौरवपर भाषण करून सन्मान केला. म. म. प्रा. वा. वि. मिराशी आणि प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी वेदाचार्यांच्या गुणवर्णनपर भाषणें केलीं. पं. सातवळेकर यांनी अत्यंत माहितीपूर्ण आणि मार्गदर्शक भाषण करून सत्काराला उत्तर दिलें. शेवटीं श्री दे. गो. वांडगे यांनी आभार मानले.

कै. बापूसाहेब चिटणवीस

विदर्भ साहित्य संघाचे आश्रयदाते, श्रीमंत बापूसाहेब चिटणवीस यांच्या अकाल मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी स्मारक समितीतर्फे दुखवटयाची सभा दि. ४-८-५९ रोजीं घेण्यांत आली. सभेंत दुखवटयाचा ठराव स्तब्ध उभे राहून संमत करण्यांत आला.

*   *

गोण्डवन शाखा—चन्द्रपूर.

दि. १७-७-५९ रोजीं चांदा येथील सभासदांची सर्वसाधारण सभा लोकाग्रणी बाबासाहेब देशमुख यांचे अध्यक्षतेखाली भरून पुढील प्रमाणे कार्यकारी मंडळ अविरोध निवडून आलें.

अध्यक्ष : श्री. गो. बा. पुल्लीवार; उपाध्यक्ष : श्री. मा. भा. फडके, कोषाध्यक्ष : श्री. रा. रा. उर्फ बाबूरावजी पोटदुखे; सरचिटणवीस : श्री. ज. गो. सन्त; चिटणवीस : श्री. बा. रा. पुट्टेवार; श्री. ए. पां. साळवे आणि सौ. शकुंतलाबाई देवईकर; पदसिद्ध सभासद : श्री. तु. ना. काटकर; सभासद : श्री. पं. भगवतीप्रसाद मिश्र, श्री. राजवैद्य अविनाशचंद्र अनवाणे, श्री. वि. व्यं. देशमुख, श्री. श्री. ब. जीवतोडे, श्री. अ. ज. राजूरकर, श्री. गं. ना. वैरागडे, श्री. चं. शं. ठवकर, श्री. न. रा. निमजे, श्री. ह. सी. डोंगे आणि सौ. मालतीबाई भागवत.

अध्यक्षांनी श्री. ह. ग. पाटील आणि श्री. वा. ना. विगम ह्यांना स्वीस्कृत सभासद म्हणून कार्यकारी मंडळावर नियुक्त केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याचप्रमाणे पुढीलप्रमाणे सांस्कृतिक समिति स्थापन झाली--आमंत्रक : श्री. ह. ग. पाटील, सभासद : श्री. न. रा निमजे, श्री. ल. सी. डोंगे श्री. बा. रा. पुट्टेवार आणि श्री. ज. गो. सन्त.

इतर समित्यांची निवडणूक पुढील सभेंत होईल असें ठरलें. त्यानंतर सभाध्यक्ष आणि शाखाध्यक्षांचीं भाषणें होऊन ही सभा संपली.

शाखेस केंद्रीय कार्यालयाकडून रीतसर मान्यता दि. ४-८-५५ रोजीं मिळाली.

*   *

गोंदिया शाखा

गोंदिया शाखेने दि. १-८-५५ रोजीं दुपारीं ३ वाजतां मध्यप्रदेशाचे स्वास्थ्यमंत्री श्री. कन्नमवार यांचे अध्यक्षतेखाली टिळक पुण्यतिथि साजरी केली. समारंभाचे प्रमुख वक्ते पुण्याचे ज्ञानकोशकार श्री. य. रा. दाते यांचें कै. लोकमान्यांच्या आयुष्यावर भाषण झालें.

प्रथम अध्यक्षांनी लोकमान्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलि वाहिली. स्वागताध्यक्ष श्री. केशवराव इंगळे यांनी अध्यक्ष आणि पाहुण्यांचा सन्मान केल्यावर सरचिटणीस श्री. आनंद देशपांडे यांनी शाखेच्या कार्याची माहिती दिली. श्री. वसंत मातुरकर यांनी कविता म्हटल्यानंतर प्रमुख वक्त्यांचें भाषण झालें. नंतर अध्यक्षांचें भाषण झालें. शाखेचे उपाध्यक्ष श्री. कुळकर्णी यांनी उपस्थितांचे व पाहुण्यांचे आभार मानले. श्री. पंचभाई यांनी शेवटीं 'वंदेमातरम्' म्हटल्यानंतर हा कार्यक्रम आटोपला.

*   *

अमरावती शाखा

विदर्भ साहित्य संघाच्या पुनरुज्जीवनाची जबाबदारी कार्यकारी मंडळाने अमरावतीचे प्रा. मा. ल. व्यवहारे यांचेकडे सोपविली होती.

त्याप्रमाणे दिनांक २१-८-५५ रोजीं प्रा. कृ. व्यं. पेशकार, यांचे अध्यक्षतेखाली अमरावतीच्या सभासदांची सर्वसाधारण सभा घेण्यांत येऊन नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugwani) Regd. No. N 945

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ